बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | शुक्रवार,दि.४ एप्रिल २०२५ | वर्षे४थे | अंक२३२वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३




# दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये निर्दयीपणाचा कळस!

हॉस्पिटलवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करा ◆ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुतासारखे सरळ करावे ◆ मुख्यमंत्री कक्षालाही जुमानले नाही, एवढे कसे निर्ढावलेत ◆ दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल नाव मोठे अन् लक्षण खोटे!

## गर्भवती माता तनिषा सुशांत भिसेंचा हॉस्पिटलने घेतला जीव

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:पुण्यातील नामांकित दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणाने संपूर्ण शहरात खळबळ उडवून दिली आहे. प्रसूतीच्या कळा सुरु झालेल्या तनिषा सुशांत भिसे या महिलेला रुग्णालयात दाखल करण्यासाठी आणलं असता, प्रशासनाने उपचारापूर्वी १० लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. अडीच लाख रुपये देण्याची तयारी असतानाही रुग्णालयाने दाखल करून घेण्यास नकार दिला. दुसऱ्या रुग्णालयात हलवताना तनिषाची प्रकृती खालावली आणि जुळ्या मुलींना जन्म दिल्यानंतर तिचा मृत्यू झाला. या घटनेने रुग्णालयाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झालं आहे. तनिषा भिसे यांना २९ मार्च रोजी प्रसूतीसाठी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात आणण्यात आलं होतं. कुटुंबीयांचा दावा आहे की, रुग्णालयाने १० लाख रुपये जमा करण्याची अट घातली आणि अडीच लाख रुपये देण्याची तयारी दर्शवूनही तिला दाखल करून घेतलं नाही. परिणामी, तिला दुसऱ्या रुग्णालयात हलवावं लागलं, पण वाटेतच तिची तब्येत बिघडली. तिने जुळ्या मुलींना जन्म दिला, पण स्वतःचा जीव वाचवू शकली नाही. तनिषाचे पती सुशांत भिसे हे भाजप आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक आहेत. त्यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून रुग्णालयाला संपर्क साधला, तरीही प्रशासनाने ऐकलं नाही. या घटनेनंतर आमदार गोरखे यांनी मुख्यमंत्र्यांकडे तक्रार नोंदवली आहे.

### अमित गोरखे यांचा आरोप काय?

दिनानाथ रुग्णालयाच्या मुजोरीमुळे गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोप भाजपचे आमदार अमित गोरखे यांनी केला आहे. ज्या महिलेचा मृत्यू झाला ती आमदार गोरखे यांचे पीए संतोष भिसे यांची पत्नी होती. तनिषा सुशांत भिसे असं या मृत्यू झालेल्या गर्भवती महिलेचं नाव आहे. तनिषा यांना रुग्णालयात दाखल करण्यासाठी दिनानाथ रुग्णालयानं १० लाखांची मागणी केली होती. कुटुंब अडीच लाख भरण्यासाठी तयार असताना देखील या महिलेला अ‍ॅडमिट करण्यात आलं नाही. रुग्णाची अवस्था सिरिअस असताना देखील रुग्णालयानं त्यांना अ‍ॅडमिट केलं नाही, असा आरोप गोरखे यांनी केला आहे. आपन या प्रकरणाचा मुद्दा विधानसभेत उचलणार असल्याचा इशारा देखील त्यांनी दिला आहे.

### महिला आयोगाची दखल

या प्रकरणाची गंभीर दखल घेत महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी तातडीने पावलं उचलली आहेत. चाकणकर म्हणाल्या, दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या हलगर्जीमुळे एका मातेचा जीव गेला ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. आम्ही याची चौकशी करणार आहोत. आयोगाने पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तांना तथ्य तपासून कार्यवाही करण्याचे आणि वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. महिलांच्या सुरक्षेसाठी आणि न्यायासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असं चाकणकर यांनी स्पष्ट केलं.

### रुग्णालयाची प्रतिक्रिया

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे जनसंपर्क अधिकारी रवी पालेकर यांनी सांगितलं, या घटनेची चौकशी केली जाणार आहे. आम्ही राज्य सरकारला अहवाल सादर करू. मीडियात येणाऱ्या बातम्या अर्धवट आहेत. आरोपांची तपासणी होईल, पण सध्या जास्त बोलता येणार नाही. रुग्णालयाने आरोप फेटाळले असले तरी या प्रकरणाने त्यांच्या प्रतिष्ठेला धक्का बसला आहे.

### जनतेचा संताप...

या घटनेनंतर पुणेकरांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. जीवापेक्षा पैसा महत्त्वाचा का? असा सवाल सोशल मीडियावर उपस्थित होत आहे. तनिषाच्या कुटुंबीयांनी रुग्णालयावर कठोर कारवाईची मागणी केली आहे. हे प्रकरण आता चौकशीच्या कक्षेत असून, महिला आयोगाच्या हस्तक्षेपामुळे यातून काय निष्कर्ष निघतो, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.



## लिंबाच्या झाडावर कोसळली वीज

अस्मानी:शेतकऱ्यासह गाईचा झाला मृत्यू

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील आडस,केकानवाडी या भागात अवकाळी पाऊस झाला. यावेळी वीज कोसळून शेतकऱ्याचा अन् गायीचा मृत्यू झाल्याची घटना तासभरा पूर्वी घडली आहे. देवीदास शहाजी केकाण (वय ६५ वर्ष) रा. केकाणवाडी असे वीज कोसळून मयत झालेल्या शेतकऱ्याचे नाव असून, ते दुपारी आसरडोह रस्त्याकडील नवरुका शिवारात जनावरे चारीत होते. यावेळी अचानक पाऊस आल्याने ते लिंबाच्या झाडाखाली उभे होते. यावेळी या झाडावर वीज कोसळून शेतकरी देवीदास केकाण जागीच ठार झाले तर एक गाय ही दगावली आहे.वेधशाळेने गारपीट व वादळीवाऱ्यासह अवकाळी पावसाचा अंदाज » पान २ वर

## निवडणूकात शिवसेनेचा भगवा फडकवा

बाप्पूसाहेब मोरे: बीडमध्ये शिवसेनेची आढावा बैठक



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या काही वर्षांपासून रखडल्या होत्या. विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. राज्यात शिवसेनेला मिळालेल्या अफाट यशानंतर बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्येही शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी शिवसैनिकांनो पूर्ण ताकदीने कामाला लागा. शिवसेना सदस्य नोंदणीचे फॉर्म जास्त संख्येने भरून शिवसेना पक्ष संघटन मजबूत करा असे शिवसेना बीड जिल्हा संपर्क प्रमुख बाप्पुसाहेब मोरे यांनी शिवसेना बीड जिल्हा आढावा बैठक तथा सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभा प्रसंगी आपले मत व्यक्त केले.

शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री ना. एकनाथजीशिंदे साहेब तथा खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार तसेच शिवसेना सचिव संजय मोरे साहेब, शिवसेना उपनेते व मराठवाडा संपर्कप्रमुख अर्जुनभाऊ खोतकर साहेब आणि मराठवाडा » पान २ वर

## राजेगावमध्ये जलजिवचे काम अर्धवट!

बोंबला:ग्रामस्थ करताहेत प्रश्न उपस्थित

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील राजेगाव मध्ये जलजिवन योजनेचे काम अर्धवट करण्यात आले आहे तरी जलजिवन कार्यालयातील उपअभियंता इंजिनिअर



अभियंता एवढे अधिकारी शासनाचा पगार घेतात मग कामे पूर्ण करुन का घेत नाहीत असा प्रश्न नागरिकांना पडला आहे कारण केज तालुक्यातील राजेगाव सह अनेक गावांमध्ये जलजिवनच्या कामात भ्रष्टाचार,कामे अर्धवट करण्यात आली आहे तरी सुद्धा जलजिवन कार्यालयातील अधिकारी गुत्तेदारावर कार्यवाही करत » पान २ वर

## आ.संदीप क्षीरसागरांच्या प्रयत्नाला यश

दिलासा:बिंदुसरा नदीवरील पूल कम बंधाऱ्याचा शुभारंभ

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: शहरातील बिंदुसरा नदीच्या पात्रात पूल कम बंधारा बांधणीच्या कामाला अखेर सुरूवात झाली असून आ.संदीप क्षीरसागरांनी गुरूवारी (दि.३) रोजी या कामाचा शुभारंभ केला. आ.क्षीरसागर हे गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने यासंदर्भात पाठपुरावा करत आहेत. या कामाची सुरूवात झाली असून लवकरच हे काम पूर्ण होणार आहे. या पूल कम कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यामुळे बीड शहर आणि परिसरातील आसपासच्या गावांमध्ये भूजल पातळीत मोठी वाढ होणार आहे. ही आनंदाची बाब आहे.

बीड शहरातील बार्शी नाक्याजवळील असलेल्या बिंदुसरा नदी पात्रात पूल कम कोल्हापूरी बंधारा तयार करावा. जेणेकरून बिंदुसरा नदीतून » पान २ वर



### पाणी साठवण्यासाठी मोठा फायदा

शुभारंभ झालेल्या बिंदुसरा नदीवरील पूल कम कोल्हापूरी बंधाऱ्यामुळे बीड शहर आणि आजूबाजूच्या साधारण ५ किलोमीटर पर्यंतच्या परिसरात भूजल पातळीत वाढ होणार आहे. बीड जिल्ह्यात पावसाची अनियमितता असल्याने प्रत्येक उन्हाळ्यात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होते. परंतु या कोल्हापूरी बंधाऱ्यामुळे पाणी साठवणूक होईल. परिणामी पाणी उपलब्धता आणि शेती सिंचनासाठी याचा खूप मोठा फायदा या पूल कम बंधाऱ्याचा होणार आहे. बिंदुसरा नदीवर बंधारा कम पूल ही संकल्पना मोठी दूरदर्शी होती. ती आ.संदीप क्षीरसागर यांनी डोळ्यासमोर ठेवून हे काम होण्यासाठी निरंतर प्रयत्न केले. शासन आणि प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. अनेकवेळा अधिवेशनातही हा मुद्दा मांडला. दरम्यान आता आ.संदीप क्षीरसागरांच्या प्रयत्नांना यश आले असून लवकरच हे काम पूर्ण झालेले असेल.


दणका | विभागीय आयुक्तांचे बीड जिल्हाधिकाऱ्यांना अर्ध-शासकीय पत्र

## भूसंपादन मावेजा भ्रष्टाचार भोवणार!

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:भूसंपादन ल.पा. बीडचे तत्कालीन उपजिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात एकूण २० संचिकेत भ्रष्टाचार झाल्याची तक्रार केली होती. या तक्रारीचा पाठपुरावा करण्यासाठी वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हा संघटक अजय सरवदे यांच्याकडे प्रतिनिधित्व दिले होते. तक्रारीच्या अनुषंगाने रोहयो उपायुक्तांनी तक्रार अर्जातील सर्व मुद्यांना विचारात घेऊन सखोल चौकशी करत अहवाल स्वयंस्पष्ट अभिप्रायसह विनाविलंब सादर करण्याचे आदेशित केले होते. तत्कालीन उपजिल्हाधिकारी मच्छिंद्र सुकटे यांनी सखोल चौकशी करत अहवाल जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे सादर करण्यात आला होता. तत्कालीन जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा यांनी सदर प्रकरणी अहवाल तयार करण्यासाठी श्रीनिवास मुळे यांची जिल्हाधिकारी बीड



(समन्वय) या ठिकाणी प्रतिनियुक्ती करण्यात आली तदनंतर त्रुटीयुक्त अर्धवट अहवाल मा. विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर यांच्याकडे सादर करण्यात आला होता.

दिनांक १३.१२.२०२२ रोजी समीक्षा चंद्राकर उप-आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांनी सदर चौकशी अहवालाचे अवलोकन केले असता त्यामध्ये अनियमितता झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते एकंदर प्रकरणात पुढील कारवाई करण्याच्या अनुषंगाने निर्देश देण्यात येत आहेत. चौकशी अहवालात नमुद अनियमिततेबाबत जिल्हाधिकारी यांनी त्यांचे स्तरावर जबाबदारी निश्चीत करावी, प्रकरणात अनियमिततेस/गैरप्रकारास कारणीभूत जबाबदार संबंधीत » पान २ वर

जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर यांनी दिलेल्या अर्ध-शासकीय पत्राकडे पाहायला सुद्धा वेळ नाही गेल्या २८ दिवसापासून सदरील अर्ध शासकीय पत्र जिल्हाधिकारी बीड येथील समन्वय विभागांमध्ये धुळखात पडलेले आहे. उपजिल्हाधिकारी धुमाळ यांचेकडे समन्वय विभागाचा पदभार असून ते दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे तसेच पाटील व हंगे साहेब यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या निदर्शनास सदरील प्रकरण आणून दिले आहे किंवा नाही याबाबत माहिती उपलब्ध नाही. सदरची फाईल जिल्हाधिकारी बीड यांच्या टेबलवर असल्याचे सांगितले जात आहे.

-अजय सरवदे, जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड



## पर्यावरण पूरक ई-बाईक

महाराष्ट्र सरकारने संपूर्ण राज्यात ई-बाईक टॅक्सींना परवानगी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्य मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनंतर या संदर्भात परिवहन खात्याकडून एक धोरण नियमावली ठरवून, प्रवासी भाडे किती असणार यावर लवकरच निर्णय होईल; परंतु ते निश्चितच प्रवाशांना लाभदायक ठरेल, यात कोणतीही शंका नाही. मुंबई शहराप्रमाणे राज्यातील अनेक शहरांतून प्रवास करणाऱ्यांसाठी ट्रेन, एसटी, बसेस, रिक्षा, टॅक्सीची सुविधा असताना ई-बाईकची काय आवश्यकता आहे, असा प्रश्न आपल्यातील अनेकांना पडला असेल; परंतु एकटा प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्याही काही कमी नाही. अशा एकट्या प्रवाशांना रिक्षा, टॅक्सी बरोबरच ई-बाईक टॅक्सीचा पर्याय पुढील काळात उपलब्ध होणार आहे. तसे पाहिले तर, काही देशांमध्ये तसेच भारतात विशेषत: गोवा राज्यातही ई-बाईक सेवा या आधीपासून सुरू आहे.

दुचाकी टॅक्सी सेवेत दुचाकीद्वारे प्रवाशांची वाहतूक केली जाणे हा त्याचा सरळ अर्थ आहे. अशा प्रकारच्या कार्ट बाईक किंवा बाईक टॅक्सींना काही देशांमध्ये प्रवासी वाहतुकींचा विशेष परवाना देण्यात आलेला आहे. ज्या ठिकाणी साधारणत: पर्यटकांची संख्या जास्त असते, त्या ठिकाणच्या देशात ई-बाईक टॅक्सी मोठ्या प्रमाणात धावताना दिसतात. यातील प्रवासी हा दुचाकी चालवणाऱ्याच्या मागे बसून प्रवास करतो. काही देशांमध्ये या टॅक्सी चालकाच्या गणवेशाचा रंगही निश्चित केलेला असतो. गोव्यामध्ये सर्वात पहिली दुचाकी टॅक्सी सेवा सुरू झाली आणि यशस्वीही ठरली आहे. आता महाराष्ट्रात या ई-बाईक टॅक्सी सेवेला संमती देण्यात आली आहे, त्याचे स्वागत करायला हवे.

दुसरे म्हणजे गोव्यात ई-बाईक टॅक्सीचा प्रयोग यशस्वी ठरण्यामागे तेथे पर्यटकांची संख्या मोठी आहे. देश-विदेशातले पर्यटक या ठिकाणी येतात. पर्यटन स्थळांना भेट देण्यासाठी अनेकदा अरुंद रस्त्यांवरून जावे लागते. त्यामुळे ई-बाईक टॅक्सीला गोव्यात पर्यटक प्रवाशांकडून चांगली पसंती आहे. महाराष्ट्रात अनेक पर्यटन स्थळे आहेत. धार्मिक पर्यटन स्थळे म्हणून तुळजापूर, शिर्डी, आळंदी, जेजुरी यांसह अनेक ठिकाणांना होणारी गर्दी पाहता, केवळ मुंबई, महानगरांसह अनेक धार्मिक स्थळांच्या ठिकाणी ई-बाईक टॅक्सीला मोठ्या प्रमाणात मागणी होऊ शकते, असे आता तरी वाटते. त्यामुळे महाराष्ट्र सरकारच्या परिवहन खात्याने प्रवाशांचे हित लक्षात घेऊन जो निर्णय घेतला आहे. त्यातून रोजगार निर्मितीचा नवा पर्यायही उभा राहणार आहे.

ई-बाईक टॅक्सी म्हणजे इलेक्ट्रिक बाईकची सेवा होय. पारंपरिक टॅक्सी किंवा रिक्षा ऐवजी ई-बाईक टॅक्सीचा वापर या सेवेत केला जातो. पारंपरिक सायकलने फेरफटका मारण्याप्रमाणेच, वाहन-आधारित ई-बाईकने प्रवास करून पर्यावरणाचे फायदे राखता येतात. ई-बाईक रिचार्ज करण्यायोग्य बॅटरीवर चालत असल्याने तसेच, कोणतेही इंधन जळत नसल्यामुळे, ई-बाईक वातावरणात कोणतेही हानिकारक वायू सोडत नाहीत, ही जमेची बाजू आहे. या बाईकची किंमतही कमी असल्याने भविष्यात महाराष्ट्राच्या गल्लीबोळापासून प्रमुख रस्त्यांवर ई-बाईक जागोजागी दिसतील, अशी अपेक्षा करायला हरकत नाही. त्याचे कारण वाहतूक कोंडी असतानाही ई-बाईक टॅक्सी त्यातून टॅक्सी आणि रिक्षांच्या तुलनेत लवकर वाट काढू शकतात. जवळच्या अंतरावर जाण्यासाठी ई-बाईक टॅक्सीचा पर्याय हा लोकांना उपयुक्त ठरू शकतो. त्यात, शहरात वाहनांच्या धुरामुळे वाढणारे प्रदूषण कमी होणार असल्याने एकप्रकारे पर्यावरणाचा समतोल राखण्यास ई-बाईकमुळे मदत होणार आहे. प्रदूषण कमी करण्याचे काम ई-बाईकच्या माध्यमातून होणार आहे. 'अडला हरी गाढवाचे पायी धरी', अशी मराठीत म्हण आहे. त्यामुळे, शहरामध्ये रिक्षा, टॅक्सीवाल्यांकडून तिप्पट भाडे घेऊन प्रवाशांची लुबाडणूक करण्याचे काम सर्रास होते. त्यात एकटा प्रवासी असेल तर त्याची होणारी गैरसोय ई-बाईकमुळे दूर होऊ शकणार आहे.

महिला प्रवासी प्रवास करीत असताना, चालक व महिला प्रवासी यांच्यामध्ये बॅरिगेट उपलब्ध करून देण्याची जबाबदार देखील संबंधित चालकावर राहणार आहे. तसेच महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने नियमावली तयार केली जात आहे. पावसाळ्यात प्रवासी भिजू नये यासाठी त्या बाईकला कव्हर असेल अशांनाच परवानगी दिली जाईल, याची काळजी परिवहन विभागाने घेतली आहे. हवेतील प्रदूषण कमी करण्याबरोबर अधिकाधिक रोजगार निर्माण करण्याचा हेतू समोर ठेवून राज्यात ई-बाईक टॅक्सीला परवानगी देण्याचा राज्य सरकारने घेतलेला निर्णय हा योग्यच मानायला हवा. एक लाख अथवा त्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ही सेवा येत्या एक-दोन महिन्यांत सुरू केली जाणार आहे. त्याचप्रमाणे, प्रवासी भाड्यासंदर्भातली नियमावली सरकार तयार करणार आहे. रिक्षात ज्या प्रवासासाठी १०० रुपये लागतात, तो प्रवास ई-बाईक टॅक्सीमध्ये ३० ते ४० रुपयांत कसा प्रवास करू शकेल, त्याबाबत परिवहन खात्याकडून नियोजन केले जात आहे. त्यामुळे आता ई-बाईक टॅक्सीच्या माध्यमातून सर्वसामान्य प्रवाशांची गैरसोय दूर होणार आहे. वाहतुकीच्या कोंडीतून सुटका, वेगवान प्रवास हे ई-बाईक टॅक्सीचे फायदे असतील तरी, सर्वसामान्य प्रवाशांनी आणखी एका वाहतूक साधनेचा फायदा करून घ्यावा..

# येरमळा येडेश्वरी यात्रेत लोटणार भक्तीचा मेळा

## परंपरा: १२ ते १७ एप्रिल कालावधीत यात्रा

पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब: तालुक्यातील येरमाळा येथील आराध्य दैवत म्हणून राज्यासह बाहेर राज्यातही प्रसिद्ध असणाऱ्या श्री.आई येडेश्वरी देवीची चैत्र पौर्णिमा यात्रा १२ एप्रिल ते १७ एप्रिल दरम्यान होत असून मुख्य चुना वेचण्याचा व पालखीचे आमराई मंदिरात आगमन रविवार १३ एप्रिल रोजी होणार आहे. या यात्रेसाठी दरवर्षी दहा ते बारा लाखाच्यावर भाविक दाखल होत असतात त्या अनुषंगाने भाविकांची गैरसोय होऊ नये,कायदा सुव्यवस्था व भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाचे पोलीस अधीक्षक संजय पवार यांनी यात्रेच्या तयारीची पाहणी केली स्थानिक प्रशासन ग्रामपंचायत, देवस्थान ट्रस्टने यात्रेची तयारी पूर्ण केली असून देवीच्या चैत्र पौर्णिमा यात्रा महोत्सवाची कार्यक्रम पत्रिका प्रकाशित करण्यात आली आहे श्री. आई येडेश्वरी देवीच्या चैत्र पौर्णिमा यात्रेला व देवीच्या पालखी सोहळ्यात देवीच्या पालखीवर येथील पारंपारिक चुन्याच्या रानात चुन्याचे पाच खडे वेचून पालखीवर टाकण्याची प्रथा असल्याने या यात्रेसाठी राज्यभरासह पर राज्यातून लाखोच्या संख्येने भाविक भक्त येतात यामुळे या यात्रेत कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या सर्व विभागावर जबाबदारी पडते चुना वेचण्याचा व देवीच्या पालखीचे आमराई मंदिरात रविवारी १३ एप्रिल रोजी आगमन होणार आहे ह्यावर्षी येडेश्वरी देवीच्या चैत्र पौर्णिमा यात्रा १२ एप्रिल ते १७ एप्रिल दरम्यान होत असून शनिवार दिनांक १२ एप्रिल रोजी डोंगरावरील मुख्य मंदिरात रात्री नऊ वाजता देवीची चैत्र पौर्णिमा महापूजा आणि देवीचा छबिना होणार आहे रविवार दिनांक १३ एप्रिल रोजी देवीच्या पालखीचे मुख्य मंदिरातून आमराई मंदिराकडे सकाळी आठ वाजता वाजत गाजत चूण्याच्या रानात चुना वेचण्यायाचा कार्यक्रम होऊन देवीच्या पालखीचे आमराई मंदिरात सकाळी ११ वाजता प्रस्थान होईल देवीची पालखी चैत्र पौर्णिमा यात्रेत पाच दिवस आमराई मंदिरात भाविक भक्तांच्या दर्शनासाठी राहते तर सोमवार दिनांक १४ एप्रिल रोजी सकाळी अकरा वाजता पशुप्रदर्शन भरवण्यात आले आहे तर मंगळवार दिनांक १५ एप्रिल रोजी दुपारी चार वाजता कुस्त्याचा फडाचे आयोजन करण्यात आले आहे तर रात्री नऊ वाजता आराध्याची गाण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे तर बुधवार दिनांक १६ एप्रिल रोजी रात्री नऊ वाजता शोभेच्या दारूची अतिषबाजी करण्यात येणार आहे तर गुरुवार दिनांक १७ एप्रिल रोजी दुपारी चार वाजता घुगरी महाप्रसादाचे वाटप होऊन आमराईतून पालखीचे डोंगरावरील मुख्य मंदिराकडे गावातून पालखीचे वाजत गाजत मिरवत मुख्य मंदिराकडे प्रस्थान होणार आहे अशी माहिती श्री. येडेश्वरी देवस्थान ट्रस्ट,ग्रामपंचायत आणि समस्त येरमाळा ग्रामस्थ यांच्या वतीने सांगण्यात आले आहे.



# व्हाईस ऑफ मीडियाची कार्यकारिणी

## तालुकाध्यक्षपदी रामदास साबळे, कार्याध्यक्षपदी डॉ.हनुमंत सौदागर

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:व्हाईस ऑफ मीडियाच्या केज तालुकाध्यक्षपदी पत्रकार रामदास साबळे तर कार्याध्यक्षपदी पत्रकार डॉ.हनुमंत सौदागर यांची गुरुवारी (दि.३) बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

व्हाईस ऑफ मीडियाच्या तालुका कार्यकारिणीच्या नूतन पदाधिकारी निवडीची बैठक ज्येष्ठ पत्रकार मधुकर सिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली केज येथील व्हाईस ऑफ मीडियाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. या




बैठकीत व्हाईस ऑफ मीडियाच्या नूतन पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. या बैठकीस व्हाईस ऑफ मीडियाचे सचिव दीपक नाईकवाडे, कोषाध्यक्ष संतोष गालफाडे, प्रसिद्धी प्रमुख दिनकर राऊत, संघटक मनोराम पवार, किशोर पत्रावळे आदींसह संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. यावेळी नूतन तालुकाध्यक्ष, कार्याध्यक्ष यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. व्हाईस ऑफ मीडियाच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे.

# परळीत हाऊसफुल्ल जनता दरबार

## पंकजा मुंडे:जनतेच्या समस्यांचा जागेवरच निपटारा

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:राज्याच्या पर्यावरण, वातारणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचा आज परळीत हाऊसफुल्ल जनता दरबार झाला. त्यांना भेटून समस्या मांडण्यासाठी यशःश्री निवासस्थान अक्षरशः गर्दीने फुलून गेले होते. ना. पंकजाताईंनी प्रत्येकाला वैयक्तिक भेटून त्यांची गाऱ्हाणी ऐकली व त्यांच्या प्रश्नांचा जागेवरच निपटारा केला.

ना. पंकजाताई मुंडे यांचे बुधवारी रात्री उशीरा शहरात आगमन झाले. आज सकाळपासूनच यशःश्री निवासस्थानी त्यांना भेटण्यासाठी मतदारसंघातील, जिल्हयातील तसेच जिल्हया बाहेरून नागरिक व कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. आलेल्या प्रत्येकांना भेटत, त्यांची गाऱ्हाणी ऐकून घेत त्यांनी



जनतेच्या समस्यांचे जागेवरच निराकरण केले. लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या पुण्याईचा वसा अन् वारसा जबाबदारीने पुढे नेण्याची प्रेरणा देणारी ही गर्दी होती. सत्तेतील मंत्रीपदाचा वापर तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करेल असं त्या यावेळी म्हणाल्या.

# पान एक वरून

**लिंबाच्या झाडावर कोसळली**

वर्तविला होता. या अंदाजा प्रमाणे आज दुपारी ३:३० वाजण्याच्या सुमारास केज तालुक्यातील आडस परिसरात सुसाट्याच्या वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला. या घटनेची माहिती तालुका प्रशासन आणि आडस पोलीस चौकीला देण्यात आली आहे.

**निवडणूकात शिवसेनेचा भगवा**

विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांच्या प्रमुख उपस्थितीत काल दि. ३ एप्रिल २०२५ रोजी दु. १२.०० वाजताच्या दरम्यान माळीवेस चौक येथील हनुमान मंदिर सभागृहात शिवसेनेच्या बीड जिल्ह्यातील महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक आयोजित संपन्न झाली. या बैठकीत मागील सदस्य नोंदणीचा आढावा घेण्यात आला. तसेच नवीन सदस्य नोंदणीचा शुभारंभ शिवसेना, महिला आघाडी, युवासेना शेतकरीसेना, ओबीसी सेना, अनुसूचित जाती-जमाती सेनेचे आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शाखाप्रमुख व उपस्थित शिवसैनिकांच्या शुभहस्ते करण्यात आला. आपल्या शिवसेना पक्षाचे संघटन मजबूत करण्यासाठी एकनाथजी शिंदे साहेब यांची बीड जिल्ह्यातून ताकद वाढविण्यासाठी तर यंदाच्या स्थानिक स्वराज्य निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी बीड जिल्ह्यातून सर्वाधिक शिवसेना सदस्य नोंदणी फॉर्म भरण्याची जिम्मेदारी आपल्या सर्व आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शाखाप्रमुख व शिवसैनिकांच्या खांद्यावर असून आपण सर्व प्राधान्याने पुढाकार घेऊन सदस्य नोंदणीच्या अभियानात आपले सर्वोपरी योगदान द्यावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक यांनी आपल्या भाषणात केले. या बैठकीचे सूत्रसंचलन प्रतिक कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन शिवसेना उप जिल्हाप्रमुख संतोष जाधव यांनी केले.

**राजेगावमध्ये जलजिवचे काम**

का नाहीत असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. असे तर नाही गुत्तेदारांना अधिकारी पोसतात कारण गुत्तेदारावर जर अधिकाऱ्यांनी कार्यवाही केली तर गुत्तेदार माजुन जानार नाहीत कामे अर्धवट भोगस करायचे नाहीत परंतु केज तालुक्यात अधिकारी जलजिनच्या गुत्तेदाराना पोसतात का गुत्तेदार अधिकाऱ्यांना पोसत आहे हा मोठा गंभीर प्रश्न नागरिकांना पडला आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**आ.संदीप क्षीरसागरांच्या**

वाहून जाणारे पाणी अडविले जाईल. हे काम करण्यासाठी आ.संदीप क्षीरसागरांनी गेल्या अनेक वर्षांपासून हा विषय लावून धरला. अशा स्वरुपातील हे काम असणार आहे. या कामाच्या मंजूरीसाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी अनेक वर्षे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. आणि अखेर आ.संदीप क्षीरसागरांच्या अथक प्रयत्नांना यश मिळाले आहे. बिंदुसरा नदीवरील बंधार्यामुळे बीड परिसरात सिंचन आणि पाणी उपलब्धतेसाठी मोठा फायदा होणार आहे. आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रयत्नांतून बीडसाठी अतिशय फायदेशीर असलेले हे काम लवकरच पूर्ण होणार आहे.

**भूसंपादन मावेजा भ्रष्टाचार**

अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द कारवाई प्रस्तावीत करावी, आपल्या निष्कर्षानुसार अनेक प्रकरणात जास्तीचे संपादन झाल्याचे म्हटले आहे. त्याप्रमाणे ते क्षेत्र निश्चीत करुन ज्या भूधारकांचे ते संपादीत क्षेत्र दर्शविण्यात आले आहे त्यांचे नावे त्यापैकी तितका धारणाधिकार (केश्रवळपस) होता काय? ते तपासून ते क्षेत्र शासनाच्या ताब्यात घ्यावे, जास्तीचे संपादन झालेल्या क्षेत्राची तात्काळ मोजणी करुन ते ताब्यात घ्यावे, सदर संपादनाचे तात्काळ क.जा.प. करुन शासनाचे नावे मालकी लावण्यात यावी, प्रत्येक प्रकरणाचा आढावा घेवुन एकुण मागणी केलेले क्षेत्र, मोजणी केलेले क्षेत्र, संपादीत केलेले क्षेत्र, प्रत्यक्ष उपलब्ध क्षेत्र व तलावासाठी वापरात आलेले क्षेत्र यांचा ताळमेळ लावावा. तसेच सदर क्षेत्र जागेवर आहे काय? याची स्थळपाहणी करावी व त्याचा स्थळ (श्रेलरींळेप) व ताबा याची मोजणी करुन शहानिशा करावी व संपादीत क्षेत्र शासनाच्या ताब्यात घ्यावे, आपल्या अहवालातील इतर त्रुटीबाबत जिल्हाधिकारी यांनी अचूक तपासणी करुन वस्तुस्थिती तपासावी, प्रकरणातील चौकशी दरम्यान ज्या संचिका आढळून आल्या नाहीत, त्यांचा शोध घेवून उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी, अनियमितेबाबत जबाबदार अधिकारी कर्मचारी मग ते भूमिअभिलेख कार्यालयाशी संबंधीत असतील तर ते अथवा नगर रचनाकार कार्यालयाशी संबंधीत असतील तर त्यांच्यावर देखील कारवाई करावी व आपण केलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण अहवाल या कार्यालयास सादर करावा. तत्कालीन उप-जिल्हाधिकारी यांना वाचविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# पान सहा वरून

**जयभिम महोत्सवात कार्यक्रमांची**

वाजता प्रा.जयमंगल धनराज यांचे व्याख्यान होणार आहे. गुरुवार दि.१० रोजी सकाळी ११ ते ५ नृत्य स्पर्धा होणार आहे. शुक्रवार दि.११ रोजी १८ तास अभ्यास, सकाळी ८ ते १० महात्मा फुले अभिवादन, सकाळी १० ते ५ रक्तदान शिबीर होणार आहे. शनिवार दि.१२ रोजी आंबेडकर भवन येथे सकाळी ११ ते ५ चित्रकला स्पर्धा, ६ वाजता धम्मसांगिनी रामागोरख यांचे व्याख्यान. रविवार दि.१३ रोजी सेवादल मैदान डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ सायं ६ वाजता साजन बेंद्रे यांचा भिमगीत संगीत रजनी कार्यक्रम. तर रात्री १२ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते आंबेडकर पुतळा समता ज्योत रॅली. रविवार दि.१४ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता छ.शिवाजी महाराज पुतळा ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या पर्यंत प्रभात फेरी व अभिवादन कार्यक्रम तर सायंकाळी ५ वाजता छ.शिवाजी महाराज पुतळा ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक निघणार आहे.

**पुलाचे काम त्वरित पूर्ण**

वाहनधारकांना होणाऱ्या त्रासापासून त्वरित सुटका करावी आणि महामार्ग त्वरित वाहतूकदारांसाठी योग्य ती उपाययोजना करून खुला करून द्यावा तसेच ऊर्जा पेट्रोल पंपा जवळील राहिलेले पुलाचे अर्धवट काम पूर्ण करावे अशी मागणी त्यांनी संबंधित महामार्गाच्या अधिकाऱ्यांकडे केली आहे.

**आमरण उपोषणाचा घेतला**

व शाळेत जाणाऱ्या मुला , मुलींची रहदारी बंद करून कायदा व सुव्यवस्था चा प्रश्न निर्माण केला आहे तर गट नंबर १६० मध्ये ही अशाच प्रकार तत्कालीन ग्रामसेवक यांनी केला आहे या दोन्ही प्रकरणची चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी उपोषण कर्ते सुरेश साळवे व रमेश साळवे यांनी करुन येथील पंचायत समिती कार्यालय समोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

**बीडमध्ये रिपाइंकडून ईद**

दि. ६ एप्रिल २०२५ रोजी बीड शहर रिपाइंच्या वतीने बशीरगंज बीउ येथे आयोजित करण्यात आलेल्या ईद मिलन (मिलाफ) च्या कार्यक्रमास हिंदु-मुस्लीम समाज बांधवांनी उपस्थित रहावे. असे आवाहन कार्यक्रमांचे आयोजक तथा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे, राजू जोगदंड, रमेश गंगाधरे, मझरखान, किसन तांगडे, सादेक पठाण, रफीकभाई फिटर, सुलतान बाबा, सय्यद जफर, सिद्दीक फारोखी, रणजीत शिनगारे, नुरुल खान, शेख रोहील रफिक, फरहान बागवान आदिनी केले आहे.

**साहित्य संमेलन भरविणे**

आकांक्षा थोरात यांना सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व पुस्तक भेट देऊन तर समृद्धी म्हेत्रे,मयुरी जाधव व वैष्णवी शेळके यां बालकवींना उत्तेजनार्थ म्हणून सन्मानीत केले बालकुमार मराठी साहित्य संमेलनासाठी मार्गदर्शन म्हणून धर्मदत अरुण अण्णा शाळू महाराज,बाल साहित्यिक आश्रुबा कोठावळे कळंब , ड विलास पवार कवित्री सौ संध्याराणी कोल्हे कळंब,जेष्ठ गझलकार शेखर गिरी,सौ.आशा राऊत कवयित्री कळंब,गोकुळ गायकवाड जामखेड यांची उपस्थिती होती.साहित्य संमेलनासाठी ज्येष्ठ साहित्यिक प्रा.अलका सपकाळ, नवकवी पत्रकार शंकर खामकर यांच्या बरोबरच आलिम शेख सर , अंबादास देशपांडे, ह भ प अरुण काळे महाराज, श्रीमती अंजली सुतार, हरिदास पंडित,माजी सैनिक संघटना तालुका अध्यक्ष हेमंत देशमुख व दत्तात्रय काळे,शितल राऊत यांनी विशेष परिश्रम घेतले कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.अलका सपकाळ, सूत्रसंचालन अलीम शेख सर यांनी केले तर आभार नवकवी शंकर खामकर यांनी मानले.

**व्हॉइस ऑफ मीडियाच्या**

स्तरावरील पदाधिकारी यांच्या निवडी लवकरच जाहीर करण्यात येतील अशी माहिती तालुकाध्यक्ष वैजनाथ घायतिडक यांनी दिली.

**बाजारात जागा नसल्याने**

आहे तसेच बाहेर जिल्ह्यातील तसेच तालुक्यातील लोकांना बाजारात जागा उपलब्ध नसल्याने बाजारात जाता येते नाही तसेच बाजारात जागा उपलब्ध नसल्याने विक्री साठी आलेले जनावरे घेऊन आल्या वाटाने परत जावे लागत आहे व जागा उपलब्ध नसल्याने खरेदी विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना खुप मोठे नुकसान होत आहे त्यामुळे केज तहसीलदार साहेब यांनी व साळेगाव ग्रामपंचायतने बाजारासाठी मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध करून देण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून बाजारात येणाऱ्या नागरिकांन कडुन व्यक्त करण्यात येत चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**रिपब्लिकन सेनेत अनेकांचा**

वाचविण्यासाठी भायखळा राणी बाग ते आझाद मैदान येथे ५ एप्रिल रोजी महामोर्चा निघणार असून मोर्चात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन सुनील भाऊ शिंदे महेश भोसले योगेश घोडके अतुल भिंगारदिवे आदींनी केले आहे.

**यशासाठी जिद्द,चिकाटी**

फेडणे याबद्दल अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. दुसरे प्रमुख पाहुणे अँड. तेजस वाडमारे, यांनी स्पष्ट केले की विहारेही संस्कार केंद्रे व्हावीत व त्यामध्ये बालकांच्या मनावर सुसंस्कार होण्याकरता आपल्या पाल्यास दर रविवारी नियमितपणे विहारात आणून समाज प्रबोधनात्मक, तथागतांच्या , डॉ. बाबासाहेब आंबेडकर व फुले, शाहू, आंबेडकर विचारसरणीच्या सर्वच महापुरुषांच्या आदर्श विद्यार्थ्यांसमोर ठेवावा याविषयी माता भगिनींना आग्रहाची विनंती केली. तर प्रशांत वासनिक यांनी ह्या इंटरनेटच्या जमान्यात त्याचा आपल्या प्रगती करिता सदुपयोग करावा याबद्दल सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी विद्यार्थ्यांना मुलांचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डी.एम. राऊत यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करता नागसेन बुद्ध विहार महिला मंडळाच्या सर्व सदस्या व नंदिनी साबळे यांनी बहुमोल परिश्रम घेतले . कार्यक्रमास परिसरातील सोनी थोरात, विद्या कोरडे, छाया धनवे, अश्विनी साबळे, सागरबाई वीर, मनोहर कांबळे, के. एस. वाघमारे, इंजि उमाजी आठवले, संजय शिरसाठ , सुंदर तांगडे, निवृत्ती शिंदे, बहुसंख्य पालक व विद्यार्थी उपस्थिती होती सरणातयेने कार्यक्रमाची सांगता झाली.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# पर्यावरणपुरक ई-बाईक टॅक्सीचे स्वागत...

महाराष्ट्र सरकारने संपूर्ण राज्यात ई-बाईक टॅक्सींना परवानगी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्य मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनंतर या संदर्भात परिवहन खात्याकडून एक धोरण नियमावली ठरवून, प्रवासी भाडे किती असणार यावर लवकरच निर्णय होईल; परंतु ते निश्चितच प्रवाशांना लाभदायक ठरेल, यात कोणतीही शंका नाही. मुंबई शहराप्रमाणे राज्यातील अनेक शहरांतून प्रवास करणाऱ्यांसाठी ट्रेन, एसटी, बसेस, रिक्षा, टॅक्सीची सुविधा असताना ई-बाईकची काय आवश्यकता आहे, असा प्रश्न आपल्यातील अनेकांना पडला असेल; परंतु एकटा प्रवास करणाऱ्या



प्रवाशांची संख्याही काही कमी नाही. अशा एकट्या प्रवाशांना रिक्षा, टॅक्सी बरोबरच ई-बाईक टॅक्सीचा पर्याय पुढील काळात उपलब्ध होणार आहे. तसे पाहिले तर, काही देशांमध्ये तसेच भारतात विशेषतः गोवा राज्यातही ई-बाईक सेवा या आधीपासून सुरू आहे.

दुचाकी टॅक्सी सेवेत दुचाकीद्वारे प्रवाशांची वाहतूक केली जाणे हा त्याचा सरळ अर्थ आहे. अशा प्रकारच्या कार्ट बाईक किंवा बाईक टॅक्सींना काही देशांमध्ये प्रवासी वाहतुकींचा विशेष परवाना देण्यात आलेला आहे. ज्या ठिकाणी साधारणतः पर्यटकांची संख्या जास्त असते, त्या ठिकाणच्या देशात ई-बाईक टॅक्सी मोठ्या प्रमाणात धावताना दिसतात. यातील प्रवासी हा दुचाकी चालवणाऱ्याच्या मागे बसून प्रवास करतो. काही देशांमध्ये या टॅक्सी चालकाच्या गणवेशाचा रंगही निश्चित केलेला असतो. गोव्यामध्ये सर्वात पहिली दुचाकी टॅक्सी सेवा सुरू झाली आणि यशस्वीही ठरली आहे. आता महाराष्ट्रात या ई-बाईक टॅक्सी सेवेला संमती देण्यात आली आहे, त्याचे स्वागत करायला हवे.

दुसरे म्हणजे गोव्यात ई-बाईक टॅक्सीचा प्रयोग यशस्वी ठरण्यामागे तेथे पर्यटकांची संख्या मोठी आहे. देश-विदेशातले पर्यटक या ठिकाणी येतात. पर्यटन स्थळांना भेट देण्यासाठी अनेकदा अरुंद रस्त्यांवरून जावे लागते. त्यामुळे ई-बाईक टॅक्सीला गोव्यात पर्यटक प्रवाशांकडून चांगली पसंती आहे. महाराष्ट्रात अनेक पर्यटन स्थळे आहेत. धार्मिक पर्यटन स्थळे म्हणून तुळजापूर, शिर्डी, आळंदी, जेजुरी यांसह अनेक ठिकाणांना होणारी गर्दी पाहता, केवळ मुंबई, महानगरांसह अनेक धार्मिक स्थळांच्या ठिकाणी ई-बाईक टॅक्सीला मोठ्या प्रमाणात मागणी होऊ शकते, असे आता तरी वाटते. त्यामुळे महाराष्ट्र सरकारच्या परिवहन खात्याने प्रवाशांचे हित लक्षात घेऊन जो निर्णय घेतला आहे. त्यातून रोजगार निर्मितीचा नवा पर्यायही उभा राहणार आहे.

ई-बाईक टॅक्सी म्हणजे इलेक्ट्रिक बाईकची सेवा होय. पारंपरिक टॅक्सी किंवा रिक्षा ऐवजी ई-बाईक टॅक्सीचा वापर या सेवेत केला जातो. पारंपरिक सायकलने फेरफटका मारण्याप्रमाणेच, वाहन-आधारित ई-बाईकने प्रवास करून पर्यावरणाचे फायदे राखता येतात. ई-बाईक रिचार्ज करण्यायोग्य बॅटरीवर चालत असल्याने तसेच, कोणतेही इंधन जळत नसल्यामुळे, ई-बाईक वातावरणात कोणतेही हानिकारक वायू सोडत नाहीत, ही जमेची बाजू आहे. या बाईकची किंमतही कमी असल्याने भविष्यात महाराष्ट्राच्या गल्लीबोळापासून प्रमुख रस्त्यांवर ई-बाईक जागोजागी दिसतील, अशी अपेक्षा करायला हरकत नाही. त्याचे कारण वाहतूक कोंडी असतानाही ई-बाईक टॅक्सी त्यातून टॅक्सी आणि रिक्षांच्या तुलनेत लवकर वाट काढू शकतात. जवळच्या अंतरावर जाण्यासाठी ई-बाईक टॅक्सीचा पर्याय हा लोकांना उपयुक्त ठरू शकतो. त्यात, शहरात वाहनांच्या धुरामुळे वाढणारे प्रदूषण कमी होणार असल्याने एकप्रकारे पर्यावरणाचा समतोल राखण्यास ई-बाईकमुळे मदत होणार आहे. प्रदूषण कमी करण्याचे काम ई-बाईकच्या माध्यमातून होणार आहे. 'अडला हरी गाढवाचे पायी धरी', अशी मराठीत म्हण आहे. त्यामुळे, शहरामध्ये रिक्षा, टॅक्सीवाल्यांकडून तिप्पट भाडे घेऊन प्रवाशांची लुबाडणूक करण्याचे काम सर्रास होते. त्यात एकटा प्रवासी असेल तर त्याची होणारी गैरसोय ई-बाईकमुळे दूर होऊ शकणार आहे.

महिला प्रवासी प्रवास करीत असताना, चालक व महिला प्रवासी यांच्यामध्ये बॅरिगेट उपलब्ध करून देण्याची जबाबदार देखील संबंधित चालकावर राहणार आहे. तसेच महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने नियमावली तयार केली जात आहे. पावसाळ्यात प्रवासी भिजू नये यासाठी त्या बाईकला कव्हर असेल अशांनाच परवानगी दिली जाईल, याची काळजी परिवहन विभागाने घेतली आहे. हवेतील प्रदूषण कमी करण्याबरोबर अधिकाधिक रोजगार निर्माण करण्याचा हेतू समोर ठेवून राज्यात ई-बाईक टॅक्सीला परवानगी देण्याचा राज्य सरकारने घेतलेला निर्णय हा योग्यच मानायला हवा. एक लाख अथवा त्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ही सेवा येत्या एक-दोन महिन्यांत सुरू केली जाणार आहे. त्याचप्रमाणे, प्रवासी भाड्यासंदर्भातली नियमावली सरकार तयार करणार आहे. रिक्षात ज्या प्रवासासाठी १०० रुपये लागतात, तो प्रवास ई-बाईक टॅक्सीमध्ये ३० ते ४० रुपयांत कसा प्रवास करू शकेल, त्याबाबत परिवहन खात्याकडून नियोजन केले जात आहे. त्यामुळे आता ई-बाईक टॅक्सीच्या माध्यमातून सर्वसामान्य प्रवाशांची गैरसोय दूर होणार आहे. वाहतुकीच्या कोंडीतून सुटका, वेगवान प्रवास हे ई-बाईक टॅक्सीचे फायदे असतील तरी, सर्वसामान्य प्रवाशांनी आणखी एका वाहतूक साधनेचा फायदा करून घ्यावा.

# मच्छीमारांची उन्नत्ती आणि सागरी सुरक्षेला महत्त्व

**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील ब्ल्यू इकॉनॉमी हे आमच्यासाठी ड्रीम प्रोजेक्ट असणार आहे आणि म्हणून यासाठी विभागाच्या माध्यमातून आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यात येणार आहेत. यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात ब्ल्यू इकॉनॉमीसाठी मोठी तरतूद देखील करण्यात आली आहे. सागरमाला २.0 च्या माध्यमातून केंद्राचा ५0 टक्के निधी मिळतो, तर ५0 टक्के निधी राज्याची गुंतवणूक असते. आपले पंतप्रधान जेवढे महत्त्व शेतकऱ्यांना, कामगारांना देतात तेवढेच महत्त्व मच्छीमार बांधवांना देखील देतात. आम्हाला केंद्राशी संलग्न राहून सागरमाला साठी प्राप्त झालेला निधी योग्य पद्धतीने वापरला तर येणाऱ्या ५ वर्षांत आमचे मच्छीमार बांधव देखील आर्थिक समृद्ध होतील यात शंका नाही.**

**'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात मत्स्यव्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांची मुलाखत**

**मत्स्यव्यवसाय आणि बंदरे या विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर आपल्या भावना काय होत्या आणि या विभागाला तुम्ही दिशा देण्यासाठी कशा पद्धतीने प्रयत्न करत आहात?**

मत्स्यव्यवसाय आणि बंदरे या दोन विभागाची जबाबदारी माझ्यावर सोपविल्यामुळे मला निश्चितच समाधान वाटले. महाराष्ट्राला ७२० किमीची समुद्र किनारपट्टी आहे. या समुद्र किनारपट्टीला दोन्ही खात्यांच्या मदतीने न्याय देऊ शकेल असा मला विश्वास आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकाच व्यक्तीकडे ही दोन्ही खाती देणे हे दूरदृष्टीचे काम आहे. सुरुवातीला आदरणीय राणे साहेब या विभागाचे मंत्री होते. माझ्याकडील दोन्ही विभागांचा विचार केला तर राज्याचे उत्पादन, महसूल आणि रोजगार निर्मिती यांना चालना देणारे हे विभाग आहेत. महाराष्ट्र प्रगतिशील राज्य आहे. गुंतवणूकदारांना हवंहवंसं वाटणारं राज्य म्हणजे आपलं महाराष्ट्र राज्य आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात बंदरे या विभागासाठी जास्तीत जास्त गुंतवणूक यावी, रोजगानिर्मिती व्हावी असा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मानस आहे. आज आपण मत्स्यव्यवसायामध्ये देशात ११ व्या क्रमांकवर आहोत. गोड्या पाण्याच्या मासेमारीत १७ व्या क्रमांकावर आहे. यामध्ये प्रगती करण्यासाठी मोठी संधी असल्याने त्या दिशेने काम करायला मी सुरुवात केली आहे.



**कोकणातील ७२० किमी लांबीच्या समुद्रकिनाऱ्यावर जी लहान लहान बंदरे आहेत तिथे मासेमारी होते, त्याला चालना देण्याची भूमिका तुम्ही प्रामुख्याने घेतली आहे. त्यासाठी आर्थिकदृष्ट्या चालना देण्यासाठी कशा पद्धतीने काम करणार?**

यासाठी दोन मुद्द्यांवर काम करायला आम्ही सुरुवात केली. यामध्ये उत्पादन वाढवणे आणि सागरी सुरक्षा या दोन गोष्टींसाठी योग्य पद्धतीने नियोजन करावे लागणार आहे. ७२० किमी समुद्रकिनाऱ्यावर वेगवेगळ्या पद्धतीने मासेमारी होते. पालघर, डहाणू भागात पारंपरिक पद्धतीने मासेमारी होते. रायगडमध्ये पर्सनेटधारक जास्त आहेत. रत्नागिरीमध्ये पर्सनेटधारक यांच्यासोबत पारंपरिक मासेमारी करणारे आहेत. सिंधुदुर्गमध्ये जास्त पारंपरिक पद्धतीने मासेमारी होते. आमचा मच्छीमार हा फार मेहनती, कष्टकरी आहे. दिवस-रात्र हे लोक काम करतात. सरकार म्हणून मच्छीमार बांधवांना होणारा खर्च कमी कसा करता येईल यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. यामध्ये डिझेल, लाईटचा खर्च कमी करण्यासाठी आपण कशी मदत करू शकतो याबाबत उपाययोजना कोणत्या राबविता येऊ शकतात यासाठी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. म्हणूनच मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा देण्यात यावा यासाठीही आम्ही विनंती केली. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी येणाऱ्या सबसिडी, योजना यांचा वापर मच्छीमार बांधवांसाठी करता येईल.

पर्यायाने मासेमारीसाठी होणारा खर्च कमी झाल्यास त्यांना आपल्या उत्पादनावर जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करता येईल. छोट्या मच्छीमारांचा खर्च कमी करणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांचा नफा वाढेल. ते आर्थिक सक्षम होतील. मच्छीमारांच्या आर्थिक उन्नती आणि दरडोई उत्पन्न वाढण्यासाठी, आर्थिक समृद्धीसाठी पाऊल उचलावे लागणार आहे. आंध्र प्रदेश हा मासेमारी उत्पादनात फार पुढे आहे. त्यांनी किनारपट्टीवर शिस्त आणलेली आहे. मच्छीमारांचे उत्पादन वाढावे यासाठी त्यांनी राज्याच्या अर्थसंकल्पात ३० टक्के तरतूद देखील केली आहे. त्यामुळेच या क्षेत्राच्या माध्यमातून त्यांना तेवढ्या प्रमाणात महसूल प्राप्त होत आहे. त्यामुळे आपल्या सरकारच्या प्रमुखांकडे आम्ही देखील हा दृष्टिकोन मांडलेला आहे. मच्छीमारांना आर्थिक समृद्ध करण्यासाठी आम्ही प्रयत्नशिल आहोत. मासेमारीमध्ये पहिल्या पाच क्रमांकावर येण्याचा आमचा मानस आहे.

**कोल्ड स्टोरेज, पायाभूत सुविधांसह स्थानिक मच्छीमार आणि व्यावसायिक मच्छीमार यांमध्ये समन्वय साधण्यासाठी तुम्ही काय प्रयत्न करत आहात?**

कोल्ड स्टोरेज, पायाभूत सुविधांसह स्थानिक मच्छीमार आणि व्यावसायिक मच्छीमार यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी आम्ही नव्याने योजना तसेच नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याबाबत विभागाची तयारी सुरू आहे. या योजनांच्या माध्यमातून मच्छीमारांना कोल्ड स्टोरेज, सोलार सुविधा तसेच माच्छीमारांना क्रेडिट कार्ड आणि विविध बाजारपेठ उपलब्ध करून देऊ शकतो. मच्छी मार्केटमध्ये आपण जास्तीत जास्त ग्राहकांना घेऊन जाऊ शकतो, त्यासाठी मोठ्या बाजारपेठा उपलब्ध होऊ शकतात. यासाठी आम्ही इंडोनेशिया आणि नॉर्वेचा अभ्यास करायला सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर आपल्याकडे मत्स्यशेती आणण्याचा आमचा मानस आहे. जलयुक्त शिवार प्रमाणे मत्स्य तलावांची आमची कल्पना असून त्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. शेतकऱ्यांप्रमाणेच मच्छीमार बांधवांना महत्त्व असायला हवे एवढीच आमची मागणी आहे. इंडोनेशियाची ८० टक्के अर्थव्यवस्था ही मासेमारीवर अवलंबून आहे. तसेच आंध्र प्रदेश ३० टक्के निधी मासेमारीवर खर्च करत असेल, तर महाराष्ट्र हे प्रगतिशील राज्य आहे. या सेक्टरमध्ये एवढी क्षमता आहे की आज आपल्याला महसूल देणाऱ्या विभागांमध्ये त्यामध्ये मत्स्य आणि बंदरे विभागाची देखील योगदान राहील, असा विश्वास मला आहे.

**आधुनिक (पर्ससीन) मासेमारी, एलइडी बोट संदर्भात आपण पोटतिडिकीने अनेक वर्षांपासून हा प्रश्न मांडत आहात. यासाठी लोकांमध्ये जनजागृती करण्याची गरज आहे. याविषयी तुम्हाला काय वाटते?**

एलइडी मासेमारीसाठी सरकारची भूमिका अतिशय स्पष्ट आहे. आपल्या राज्यात एलइडी मासेमारीला पूर्ण बंदी आहे. अधुनिक म्हणजेच पर्ससीन संदर्भात केंद्र सरकारचे काही निकष व नियम आहेत. १२ नोटिकल माईलसच्या बाहेरच आपण पर्ससीनधारक मासेमारी करू शकतात. १२ नोटिकल माईलसच्या आतमध्ये पारंपरिक मासेमारी करणाऱ्यांचा अधिकार आहे. या भागात कुणीच येऊ नये अशी स्पष्ट भूमिका आहे. ९ जानेवारीला संपूर्ण किनारपट्टीवर ड्रोनची सुविधा आणलेली आहे. संपूर्ण किनारपट्टीवर नियमांसाठी ९ ड्रोन तैनात करण्यात आले असून नियमांचे उल्लंघन झाल्यास त्वरित कारवाई केली जाते.

**मत्स्य आणि बंदरे विभागांतर्गत समुद्र किनाऱ्यांवरील अतिक्रमित करण्यात आलेल्या जागांबद्दल आपल्या स्तरावर महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला याबाबत जाणून घ्यायला आवडेल?**

मिरकर वाडा फेज २ साठी सागरमालासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. पण योग्य वेळेत काम केले नाहीत तर हा निधी परत जाईल. निधी आणणे हे फार कसोटीचे काम आहे. केंद्र सरकार निधीचा हिशोब घेतात. म्हणून संबंधित विभागाशी संपर्क साधून मी अतिक्रमीत असलेली संबंधितांना नोटीस देऊन जागा मोकळी करून घेतली. मिरकरवाडा मोकळा झाल्यानंतर पहिल्या टप्प्यात ११ कोटींच्या विकास कामांचे भूमिपूजन लवकर करणार आहे. हा विकास स्थानिक मच्छीमारांसाठी असणार आहे. अतिक्रमण करून फायदा होणार नसून विकासकामे करून फायदा होणार आहे. स्थानिक मच्छीमारांचा विकास करणे हेच आमचे प्रमुख उद्दिष्टे आहे. याबरोबर माझ्या दोन्ही विभागांच्या माध्यमातून महसूल निर्माण झाला पाहिजे हीच माझी स्पष्ट भूमिका आहे.

**प्रामुख्याने तरुण आता प्रायव्हेट फिश फार्मिंगमध्ये येत आहेत. अनेक माशांना आता खूप प्रमाणात मागणी आहे. स्टार्टअप आणि पीपीपीच्या माध्यमातून खासगी संस्थांना सहभाग घेता यावा यासाठी काही प्रयत्न आपण करू शकतो का?**

प्रायव्हेट फिश फार्मिंग व्यवसाय करण्यासाठी इच्छित तरुणांना को-ऑप. बँकेच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. जर मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा मिळाला तर सहकारी बँकेकडून कर्ज मिळू शकेल. पीपीपीच्या माध्यमातून गुंतवणूक आणण्यासाठी काही जण तयार आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात गुंतवणूक तयार होईल. त्या आनुषंगानेच आम्ही आता एक स्पर्धा आणली आहे. मुख्यमंत्र्यांचा मानस आहे की, गोड्या पाण्याच्या मासेमारीसाठी धोरण आणावे, यासाठी आम्ही त्याचा अभ्यास करायला सुरुवात केली आहे. गोड्या पाण्याच्या मासेमारीत प्रामुख्याने भोई समाज आहे. या समाजाला आर्थिक समृद्ध करायचे आहे. आजच्या तारखेला सर्व डिझेल परतावा मच्छीमारांना देण्यात आला आहे. मच्छीमारांनी स्वावलंबी व्हावे. स्वतःचा पायावर उभे राहावे यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील आहे.

**ब्ल्यू इकॉनॉमीमध्ये महाराष्ट्राचा मोठा वाटा राहणार आहे. याचा कशा पद्धातीने विचार करता येईल?**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील ब्ल्यू इकॉनॉमी हे आमच्यासाठी ड्रीम प्रोजेक्ट असणार आहे आणि म्हणून यासाठी विभागाच्या माध्यमातून आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यात येणार आहेत. यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात ब्ल्यू इकॉनॉमीसाठी मोठी तरतूद देखील करण्यात आली आहे. सागरमाला २.० च्या माध्यमातून केंद्राचा ५० टक्के निधी मिळतो. तर ५० टक्के निधी राज्याची गुंतवणूक असते. सागरमालाकडून येणार निधी सातत्याने येत असतो. त्याचे योग्य नियोजन करून त्याबद्दल केंद्राला कळवावे लागते. आपले पंतप्रधान जेवढे महत्त्व शेतकऱ्यांना, कामगारांना देतात तेवढेच महत्त्व मच्छीमार बांधवांना देखील देतात. आम्हाला केंद्राशी संलग्न राहून सागरमालासाठी प्राप्त झालेला निधी योग्य पद्धतीने वापरला तर येणाऱ्या ५ वर्षांत आमचे मच्छीमार बांधव देखील आर्थिक समृद्ध होतील यात शंका नाही.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ५ ट्रिलियन डॉलरचे जे स्वप्न आहे यामध्ये महत्त्वाचा वाटा महाराष्ट्राचा असेल. वाढवणं बंदर हे ड्रीम रोल ठरणार आहे, याबद्दल तुम्हाला काय वाटते?**

जगामध्ये वाढवण बंदरांच्या बाबतीत २० मीटरचा ड्राफ्ट असणारे बंदर फक्त चीनमध्ये आहे. त्यानिमित्तानेच वाढवण बंदरांचा विस्तार करण्यासाठी २० मीटरचा ड्राफ्ट देशात आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहे. त्यामुळे आपण जगाच्या नकाशावर महासत्ता देशांबरोबर स्पर्धा करण्यासाठी आपला देश तितक्याच ताकदीने उतरणार आहे. वाढवण बंदर हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असून दर आठवड्याला मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली सातत्याने बैठका घेऊन आढावा घेण्यात येत आहे. वाढवणं बंदरांच्या विस्तारीकरणात २६ टक्के वाटा महाराष्ट्राचा आहे. यासाठी मच्छीमार बांधवांमध्ये जो विश्वास निर्माण करायचा आहे, त्यासाठीचे काम सुरू आहे. विकास करताना कोणाचेही नुकसान होऊ नये हीच आमची प्रामुख्याने भूमिका आहे. हा विकास करत असताना प्रामुख्याने मच्छीमार बांधवांच्या मुलांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्यात येणार आहे. त्यासाठी लागणारे कौशल्य युवकांमध्ये वाढविण्यासाठी काही कोर्स सुरू करता येतील का, यासाठी कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्यासोबत आमचे प्रयत्न सुरू आहेत. वाढवण बंदराच्या माध्यमातून देशांसोबत तळागाळातील माणसाचा देखील फायदा होणार आहे. मुख्यमंत्र्यांनी त्यासाठीची दिशा आम्हाला दिली आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होणार आहे. या एका प्रकल्पामुळे महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होणार आहे. त्यामुळे आमच्या सर्वांचे लक्ष वाढवण बंदराच्या विकासावर असणार आहे. हा प्रकल्प वेळेत सुरू करणे तसेच स्थानिकांना विश्वासात घेऊन तो प्रकल्प पूर्ण करणे या दिशेने आमची वाटचाल सुरू आहे.

**सागरमाला, ब्ल्यू इकॉनॉमी, बंदरे विकास, मासेमारी, पर्यटन या माध्यमातून सर्वसामान्य कोकणी माणसाला रोजगार निर्माण होईल, या बद्दल सर्वसामान्य जनतेला तुम्ही काय सांगाल?**

येणाऱ्या काळात शिप बिल्डिंग ही फार मोठी इंडस्ट्री आहे. या दृष्टिकोनातून या क्षेत्रात केंद्र सरकार फार मोठी गुंतवणूक करत आहे. यामध्ये महाराष्ट्र राज्य हे पहिल्या क्रमांकावर असणार आहे. शिप बिल्डिंगच्या एका प्रकल्पामध्ये जवळपास १५ हजार नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे वर्षभरात २ ते ३ शिप बिल्डिंगचे काम हाती घेतले तर चांगल्या नोकऱ्या उपलब्ध होतील. शिप बिल्डिंग सेक्टर राज्यात येऊ पाहत आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. या संदर्भात कौशल्य विकासाचे काम हाती घेण्यात येणार आहे. शिप बिल्डिंग, वाढवण प्रकल्पासाठी लागणारे रोजगार त्यासाठी लागणारे कोर्सेस आम्ही आयटीआयमध्ये आणणार आहोत. मुलांनी मोठ्या प्रमाणात यामध्ये सहभागी व्हावे असे माझे राज्यातील युवकांना आवाहन आहे. यासाठी मुलांनी ट्रेनिंग घेतली पाहिजे. योग्य वेळी सहभाग घेतला पाहिजे. यामध्ये पाहिले प्राधान्य हे राज्यातील तरुण-तरुणींना असणार आहे, असा हा मी विश्वास देतो.

**मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विभागाचे मंत्री या नात्याने मच्छीमार बांधव आणि युवकांना काय संदेश द्याल?**

राज्यातील मच्छीमार बांधव आणि युवकांसाठी ही चालून आलेली मोठी संधी आहे. बंदरे आणि मत्स्यव्यवसायाच्या माध्यमातून आज अनेक देश विकासित झाले आहेत. त्यांचे दरडोई उत्पन्न देखील वाढले आहे. ही बाब विचारात घेऊन राज्यातील मच्छीमार बांधव आणि तरुण-तरुणींनीही पुढाकार घेतला पाहिजे. मच्छीमार बांधवांच्या नवीन पिढीला मत्स्य शेतीकडे जायचे आहे. यासाठी राज्य शासन तसेच विभाग म्हणून आम्ही सदैव त्यांच्या पाठीशी उभे राहणार आहोत. यासाठी तरुणांनी व मच्छीमार बांधवांनी शासनाच्या विविध योजना आणि उपक्रम समजावून घेऊन त्यांचा लाभ घ्यायला हवा. आपले तरुण हे राज्याची खरी संपत्ती आहे. तरुणांच्या माध्यमातून राज्याला पुढे घेऊन जायचे आहे. त्यामुळे त्यांनी पुढाकार घेत तयारी दाखवली तर शासन सदैव आपल्या मदतीसाठी तत्पर असणार आहे.

**राज्यातील युवकांना आपण काय आवाहन कराल?**

येणारी पाच वर्षे तुमच्या आयुष्यात परिवर्तन घडवणारी ठरतील. आर्थिक उन्नती आणि सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह आम्ही सर्व विभाग प्रमुख तयार आहोत. राज्याच्या प्रगतीसाठी आणि युवकांच्या भविष्याच्या दृष्टीने ही सुवर्णसंधी आहे. तुम्ही पुढे येऊन या संधीचा लाभ घ्यावा, असे माझे आवाहन आहे.

**शब्दांकन : जयश्री कोल्हे, सहायक संचालक, सुजाता खरात, अंतरवासिता**

# रत्नागिरी-आठ भाताची कोकणात मोठी क्रेझ!

**माझे कोकण**

**संतोष वायंगणकर**



कोकणात भातशेतीच क्षेत्र कमी-कमी होत चालले आहे. शेती करायला कोणीही तयार नाहीत. अर्थात त्याची अनेक कारणे आहेत. भातशेतात राबण्याची मानसिकता कमी झाली आहे. मजूरच मिळत नाहीत. अशी स्थिती आहे. भातशेती करायची तर यंत्राबरोबरच शेतात अनेक राबते हात असायला पाहिजेत. मशागतीपासून भात लावणी, भात कापणी या सर्व टप्प्यांवर काम करणारी माणसे हवीत; परंतु अशा पद्धतीने काम करणारी गावात माणसेच नाहीत. शेती परवडत नाही असे म्हणून अनेकांनी भातशेती करण टाळले आहे. शेवटी कोणताही व्यवसाय किंवा शेती आपल्या घरातले किती हात राबतात त्यावरच बरचसे अवलंबून आहे. चाळीस वर्षांपूर्वी गावातल्या प्रत्येक घरात शेती व्हायची. वेगवेगळ्या भात बियाण्यांचा उपयोग करीत भातशेती मोठ्या प्रमाणावर केली जायची. चुकीची बियाणी, पावसाचा चुकलेला अंदाज निसर्गाचा विविधांगाने होणारा प्रकोप या आणि अशा अनेक कारणांनी भातशेतीच अर्थशास्त्र त्याकाळी फार कुणाला कधी जमवता आले नाही. परंपरागत जी भातशेती लागवड केली जायची यामुळे साहजिकच अनेक शेतकऱ्यांना भातशेती परवडणारी नव्हती; परंतु गेल्या काही वर्षात नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून भातशेती केली जाऊ लागली आहे. नवीन संकरीत भात बियाण्यांचा वापर करीत भातपेरणी केली जात होती. गेल्या चार-पाच वर्षांत नवीन संकरीत रत्नागिरी-८ या बियाण्यांची पेरणी मोठ्या प्रमाणात केली जात आहे. कोकण कृषी विद्यापीठाच्या संशोधनातून ही नवीन भात जाती शोधण्यात आली.



वेंगुर्ले संशोधन केंद्राने काजू 'बी'च्याबाबतीत क्रांती घडवली. वेंगुर्ले-४, वेंगुर्ले-७ या नवीन काजू 'बी'च्या प्रजाती शोधून काढण्यात आल्या. या वेंगुर्ले-७ या काजू 'बी'ला तर प्रचंड मागणी आहे. वेंगुर्ले-७ चा काजूगर साईजमध्ये मोठा असतो आणि कोकणातील काजू 'बी'ला चांगली टेस्ट असते. काजूगराच्या वेगळ्या चवीमुळेच मार्केटमध्ये कोकणातील काजूगर टिकून आहे. म्हणूनच जगभरातील अनेक देशांतून काजूगर भारतात आला तरीही कोकणचा काजूगर मात्र या सर्वांहून निराळा याप्रमाणे काजूगराची कोकणची मक्तेदारी आजही पूर्वीसारखीच टिकून आहे. भातशेतीतही एकेकाळी कोकण नंबर वन असायचे. कोकणातील ग्रामस्थांचे खाणे भात आणि मासे असायचे. कोकणातील माणसांना भात आणि मासे मिळाले की बाकी त्यांना काही नको... असे म्हटले जायचे; परंतु आता पूर्वीची स्थिती राहिली नाही. जरी भातशेती केली जात असली तरीही त्याच स्वरूप आजच्या घडीला बदलले आहे. भातशेती करणाऱ्यांची संख्या कमी आहे. भातशेती लागवडीचे क्षेत्रही कमी झाले आहे. मात्र कमी क्षेत्रावर भात लागवड करून दामदुप्पट पीक घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल दिसतो. भातशेतीच्या बाबतीत हे तंतोतंत खरे ठरले. भातशेती करायला कोणी बघत नाहीत ही वस्तुस्थिती असली तरीही नव्याने रत्नागिरी-८ सुधारित बियाण्यांचा वापर गेल्या वर्षभरात कमालीचा वाढला आहे. भातशेतीतून दामदुप्पट होणारे उत्पादन भातामध्ये क्रांती घडवणारे आहे. कमी कष्टात, कमी मेहनतीत भातलागवडीतून चांगलं उत्पन्न घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल आहे. गेल्या पाच वर्षांत याच वाणाची वाढती मागणी लक्षात घेऊन १९२ टन संकरीत भात बियाण्याची निर्मिती यावर्षी कृषी विद्यापीठाने केली आहे. मागील दोन वर्षांत रत्नागिरी-८ हे भातबियाणे कोकणातील शेतकऱ्यांना जास्तीचे उपलब्ध होऊ शकले नाही.

संकरीत आणि सुधारित भाताची वाण शेतकऱ्यांना हवी असतात. अलीकडे संकरीत भातबियाण्यांबरोबरच पारंपारी भात वाणाला पर्याय म्हणून कृषी विद्यापीठाच्या सुधारित भात बियाण्यांना मोठी पसंती मिळत आहे. कर्जत श्रेणीतील भात वाणाबरोबरच आता रत्नागिरी श्रेणीतील ८ हे वाण गेल्या हंगामात प्रचंड लोकप्रिय झाले आहे. त्यामुळे येत्या शेतीच्या हंगामात या वाणाचे भात लागवडीचे क्षेत्र वाढण्याची शक्यता आहे.

भात लागवड क्षेत्र वाढल्याने कोकणातील शेतकऱ्यांच्या घरी हक्काचे भात बियाणे असणार आहे. कोकण कृषी विद्यापीठाबरोबरच अनेक कृषी कंपन्या भात पिकासाठी वाण संशोधनात क्रांतिकारी प्रयोग करत आहेतच. यातून संकरीत बियाण्यांचा मोठ्या प्रमाणात पुरवठाही वाढला आहे. अनेक वैशिष्ट्यांनी असलेली ही भात बियाणी शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरत आहेतच. अशातच रत्नागिरी-८ या भातबियाण्यांच्या माध्यमातून कृषी विद्यापीठाला सुखद धक्का बसला आहे. यामुळेच या चालू हंगामात रत्नागिरी-८ हे संकरित भात बियाणे कमी पडू नये यासाठी विक्रमी असे बियाणे निर्माण करण्याचा प्रयत्न कोकण कृषी विद्यापीठाचा आहे.

पूर्वी शेतकरी भात बियाण्यांसाठी स्वतःच आपल्या शेतातून काही भाग संगोपन करायचे. बियाणे म्हणून जपून ठेवायचे. पण अलीकडे ही परंपरा अनेक शेतकऱ्यांनी मोडीत काढली आहे. प्रतिवर्षी पावसाळ्यात बियाणे खरेदी करण्याचा त्याचा कल असतोच. चवीला उत्तम, मध्यम बारीक दाणा, १३ दिवसांत तयार होणाऱ्या 'रत्नागिरी -आठ' (सुवर्णा मसुरा) या भाताची गोडी महाराष्ट्रासह अन्य सहा राज्यांनाही लागली आहे. या वाणाला असलेल्या वाढत्या मागणीमुळे डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने यावर्षी गतवर्षीपेक्षा तिप्पट १९२ टन बियाणे वितरणासाठी तयार केले आहे. कृषी विद्यापीठांतर्गत असलेल्या शिरगाव येथील भात संशोधन केंद्राने २०१९ साली 'रत्नागिरी आठ' हे वाण विकसित केले. देशातील काही खासगी कंपन्या विद्यापीठाच्या मान्यतेने बियाणे तयार करून विक्री करत आहेत. कोकणातील रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, पालघर, ठाणे या पाच जिल्ह्यांमध्ये या वाणाने लोकप्रियता मिळवली आहे. गेल्या चार वर्षांत या वाणाला उत्तर प्रदेश, छत्तीसगड, ओडिशा, बिहार, आंध्र प्रदेश, तेलंगणा या राज्यातूनही पसंती मिळत आहे.

जसे पारंपरिक भात बियाण्यांमधून सुधारित बियाण्यांची निर्मिती झाली. या संकरीत बियाण्यांमुळे शेतीतला उत्पादनाचा टक्काही वाढला. पूर्वीचे भातशेतीचे अर्थशास्त्र पूर्णपणे बदलले आहे. कमी परिश्रम, कमी खर्चात, जास्तीचे उत्पन्न असा हा शेतीतला नवीन फंडा आहे. यामुळेच रत्नागिरी-८ संकरित भातशेतीकडे शेतकऱ्यांचा ओढा वाढला आहे. कोकण फार पूर्वीपासून भातशेतीसाठी प्रसिद्ध होतेच, फक्त मधल्या काही कालावधीत कोकणात मोठ्या प्रमाणात भातशेतीच क्षेत्र गावो-गावी ओस पडले होते. या ओस पडलेल्या शेतीने कोकणच एक विदारक सत्य लोकांसमोर आले; परंतु आता पुन्हा एकदा कोकणात आंबा, काजू, जांभुळ, कोकम लागवडीबरोबरच भातशेती करण्याकडे कल दिसून येतो. या सकारात्मकतेने बदललेल्या शेती क्षेत्रात प्रगत होणार कोकण निश्चितच प्रगतीचा पुढचा टप्पा गाठेल.

## राशिभविष्य

गुरुवार, ३ एप्रिल २०२५

**|| पंचांग ||**

आज मिती चैत्र शुद्ध द्वितीया शके १९४७. चंद्र नक्षत्र अश्विनी. योग वैधृती. चंद्र राशी मेष भारतीय सौर १३ चैत्र शके १९४७. गुरुवार दि. ३ एप्रिल २०२५. मुंबईचा सूर्योदय ०६.३१, मुंबईचा चंद्रोदय ०७.४८, मुंबईचा सूर्यास्त ०६.५२, मुंबईचा चंद्रास्त ०८.४८, राहू काळ ५.२० ते ०६.५२. छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी - तारखे प्रमाणे, शुभ दिवस.

**|| भविष्य ||**

**मेष** : आवडत्या माणसाबरोबर दिवस चांगला जाईल.

**वृषभ** : विरोधकांवर अंकुश ठेवाल. प्रवासाचे योग.

**मिथुन** : नवीन केलेले बदल व्यवसायास पोषक ठरतील.

**कर्क** : बहुतेक सर्व कामात यश मिळेल. भाग्य साथ देईल.

**सिंह** : महत्त्वाची कामे पूर्ण करू शकाल. सर्व बाबतीत यश मिळेल.

**कन्या** : आपल्या रोजच्या कामात आपण कार्यमग्न राहाल.

**तूळ** : एखादी महत्त्वाची बातमी कळेल.

**वृश्चिक** : मालमत्तेविषयीचे प्रश्न सुटू शकतील.

**धनू** : प्रगती करण्याची संधी मिळेल.

**मकर** : व्यवसाय-धंद्यातील परिस्थिती सर्वसामान्य राहील.

**कुंभ** : रागावर नियंत्रण ठेवा. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने करा.

**मीन** : नवीन वस्तू खरेदी करू शकाल.

# धैर्यबाहूंचा भरोसा...

*जया लाभाचिया आशा*
*करुनि धैर्यबाहूंचा भरवसा*
*घालीत षट्कर्मांचा धारसा |*
*कर्मनिष्ठ ॥ ६.४७४॥*



ज्या वस्तूच्या प्राप्तीच्या आशेनं, धैर्यरूपी बाहूंचा विश्वास धरून, कर्मनिष्ठ लोक षट्कर्मांच्या प्रवाहात उडी टाकतात, त्या एका वस्तूकरता ज्ञानीजन ज्ञानाचं चिलखत घालतात. सकल संकटांचा परिहार करणारा गुरू म्हणजे ओल्या अंगणातला कल्पतरू! त्याला अक्षरांचा पूर्ण अधिकार आणि तोच ईश्वरकृपेचा आधार. आपण अनेक जन्मांचे भारवाही हमाल. त्याच्या अनंत उपकारांनी देह जड होतो. असा तो सर्वज्ञानाचा पिता. त्याच्या सुवचनांची व्याप्ती अमर्याद. आपलं चित्त जणू भुताचं घर. तो अकर्मदोष निवारण करतो. तो सांगतो, 'एकान्तात वास करा. संकल्पाचा नाश होत नाही.' दंभाच्या डोहातून तो बाहेर काढतो. आपल्या जीविताचं भांडवल काळाच्या हाती असलं तरी गुरू ते भांडवल सत्कारणी लावतो, हाच गुरुभक्तीचा निव्वळ नफा! चतुरांच्या सभेतले पंडित आपण, संतोषतरुंची रोपं कधी लावतच नाहीत. अशा वेळी धैर्यबाहूंचा आधार देणारा गुरू अधिक विश्वासाचा आहे. हे मनोमन मान्य करतो. तो अनुग्रह करून बहात्तर नाड्यांची शुद्धी करतो. तेव्हा अज्ञानाचा नाश होतो. एवढंच नाही, तर आपल्या इष्टसिद्धीच्या कल्पना तो जाणतो. गुरूचा ग्रह आपल्याबद्दल अनुकूल होतो.

आपल्या शरीराचा अतिपवित्र भाग म्हणजे मस्तक. त्याच्या मध्यभागी ताळूच्या ठिकाणी ब्रह्मरंध्र असतं. इथूनच आत्मा शरीरात प्रवेश करतो, राहतो आणि अंतसमयी योग्याचा प्राण जातो, तेव्हा ताळू फुगून खसखस असते तिच्या दाण्याएवढं छिद्र पडतं अन् आत्मा निघून जातो, ती जागा म्हणजे ब्रह्मंध्र! हे तंत्रशास्त्र योगानं जाणता येतं. गुरू सांगतो. शिकवतो.

मनाची देवता चंद्र. मनाचं न-मन होतं गुरुनमनानं. मग साधक चंद्रलोकात प्रवेश करतो. तिथं शांत होतो. तापमुक्त होतो. शीतल होऊन श्वेतकमळाच्या मध्यभागी म्हणजे सूक्ष्म देहानं, मन-बुद्धीद्वारा जर ध्यानाच्या वेळी आत्म्याकडे पाहिलं तर काय दिसतं? आपला आत्मप्रकाश! चांदण्याप्रमाणे शुभ्रधवल. तिथं वास असतो गुरूचा. तिथं पोहोचण्याचा उपाय म्हणजे गुरुमंत्र. 'मी तोच आहे' किंवा 'तो मीच आहे' हा अद्वैताचा दैवी आनंद! मी दिव्यत्वाचा वारसदार आहे, हा आत्मभाव दृढ होतो. अ, ऊ, म ही अक्षरं ताळूच्या मध्यभागी त्रिकोणात असतात. हा आकार कुंडलिनीच्या विवक्षित व्यवस्थेत डोक्याचा भाग फुगवटा धरून वर आलेला असतो. या त्रिकोणात असतं हजार पाकळ्यांचं कमळ. अर्थात हजार नाड्या केंद्रित झालेलं केंद्र आहे. आपल्या बहात्तर हजार नाड्यांची शुद्धी झाली की हे कमळ विकास पावतं. पूर्ण फुलतं. तिथं चित्त एकाग्र केलं की संसारताप नष्ट होतो. श्रीगुरूची आपल्यावर दिव्य दृष्टी असते. महादेव म्हणतात, 'हे प्रिये, संपूर्ण चौदा भुवनं उत्पन्न करणारी, इच्छित पदार्थांची निःशेष पुष्टी करणारी, सर्व शास्त्रांचं ज्ञान करून देणारी, लौकिक ऐश्वर्याचं क्षणभंगुरत्व दाखवणारी, अवगुणांचं परिमार्जन करणारी गुरूची दृष्टी दिव्य असते. 'तत्' पदार्थावर शिष्याचं लक्ष एकाग्र करणारी जगत्रूप दृश्याची परमदृष्टी म्हणजे गुरूची दृष्टी. मुक्तिमार्गावर साधकाची निष्ठा टिकवून ठेवते.'



**श्री गुरुगाथा**

**अरविन्द दोडे**

हे सर्व अमृतानुभव यावेत म्हणून साधना करावी. हे गूढ गहन अध्यात्मज्ञान आहे. एक कथा आठवते -

एका झोपडीत एक गुरुदेव आणि एक शिष्य राहात होते. दोघांचा व्यवसाय होता मातीची खेळणी करून विकण्याचा. गुरूंनी त्याला शिकवलं होतं की, खेळणी कशी तयार करावीत. दोघंही आठवड्याच्या बाजारात जात, खेळणी विकत. खाऊन पिऊन सुखानं राहात. काम करताना गुरुनाम जपत. फावल्या वेळात गुरुगान गात.

गुरूनं केलेल्या खेळण्यांपेक्षा शिष्याची खेळणी अधिक आकर्षक असत. म्हणून ती विकली जात असत. त्यामानानं गुरूची खेळणी कमी विकली जात, तरीही गुरू त्याला म्हणत,

"अधिक उत्तम व्हायला हवीत खेळणी!"

हे नेहमी ऐकून ऐकून तो भडकला. म्हणाला,

"तुमच्यापेक्षा मी उत्तम काम करतो. माझी खेळणी जास्त विकली जातात! तुमच्या कामात आधी सुधारणा करा. मग मला सांगा."

तेव्हा गुरूंनी खुलासा केला,

"मलाही असाच राग आला होता एकदा, जेव्हा माझ्या गुरूंच्या सततच्या अशा बोलण्यामुळे! ते म्हणत, 'सुधारणा कर.' मग मी भांडलो. त्यांनी सांगणं बंद केलं. माझ्या कामात पुढे सुधारणा होणं बंद झालं. मी अर्धवट कलाकार झालो. तसं तुझं होऊ नये, एवढीच इच्छा आहे. मला गर्व झाला होता, तसा तुला होऊ नये, हाच हेतू आहे. यापुढे तुला बोलणार नाही काही!"

शिष्याने गुरूचे पाय धरले. म्हणाला,

"गुरुदेव क्षमा करा. मला पूर्ण कलाकार करा!"

यानंतर तो मोठा कलाकार झाला आणि पुढे मोठमोठे पुतळे, मूर्ती घडवू लागला. मंदिरांचं दगडी बांधकाम करून कीर्तिवंत झाला.

गुरुआज्ञा पाळल्यानं शिष्य निष्णात होतो. त्याचा राग आला तरी त्यामागे आत्मकल्याणाचा उदात्त हेतू असतो. गुरूचा स्वार्थ काय? काहीच नाही. आज्ञा नाही पाळली तर शिष्य अर्धवटच राहतो. पुढे शिव सांगतात पार्वतीला,


*'सकलसमयसृष्टिः*
*सच्चिदानंद दृष्टी ॥'*

सूर्यस्नानाप्रमाणे गुरूच्या दिव्य दृष्टीत आत्मसूर्यस्नान घडतं. जे साध्य करण्यासाठी अनेक जन्म तपस्या करावी लागते, ते गुरू आपल्या कृपादृष्टीनं सहज करू शकतो. संकटकाळात गुरूकडे धाव घेण्यापेक्षा गुरुदृष्टीची तेजस्वी किरणं सकल संकटांवर मात करते. म्हणून अनन्य भक्त नित्यनेमानं गुरुभक्ती करतात. नामस्मरण करतात. निष्कंटक होतात. अनिष्ट निवारण होतं. बाधामुक्त होऊन तो निर्भय होतो. युद्धस्वी देवतांच्या हातात शस्त्र असतं. त्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि धार्मिक शत्रूंचा नाश करतात. गुरू निःशस्त्र असतो. तो तपोबलानं राक्षसांचा वध करतो. नीतिधर्माची घडी बसवतो. केवळ दृष्टीतच इतका पराक्रम असतो की, देवदेवीही त्याचा आदर करतात. गुरू हा दृष्टिसमोरची अशाश्वत सृष्टीतील फोलपणा पटवून देतो. सत्यसृष्टीचं दर्शन घडवतो. तो समजावतो, "जीवनाला कंटाळू नका. जगाला टाळू नका. सर्वांचा प्रेमानं स्वीकार करा. अतिबुद्धिमान दूर जातील, ते अन् त्यांचं नशीब! सुखानं संसार करा. प्रेमानं वातावरण भरून टाका. मुक्तीचा मार्ग सोडू नका..." वगैरे. ही आज्ञा जो पाळतो त्याची प्रज्ञा तेजाळते. प्रकाशमान होते. यापेक्षा लाभ कोणताच नको. त्याचं सतचित् आनंदमय स्वरूप पाहणं, अनुभवणं, एकरूप होणं हा मथितार्थ!

जय गुरुदेव!

arvinddode@gmail.com

# उपयुक्तता



जगात प्रत्येक माणूस हा उपयुक्त आहे. तो निर्माण झाला याचा अर्थच तो उपयुक्त आहे. सफाई कामगार किती उपयुक्त? उद्या जर ठरवून ते आलेच नाहीत, त्यांनी कचरा नेलाच नाही, तर आपल्याला नाक धरण्याची वेळ येईल. घराबाहेर पडणे गैरसोयीचे होईल. हे कधी? जर सफाई कामगारांनी संप पुकारला तर. कारकुनांनी संप पुकारला तरी तेच, अधिकाऱ्यांनी संप पुकारला तरी तेच. डॉक्टरांनी संप पुकारला तर अवघा Chaos होईल. कारण ह्यांबरोबरच आपल्याला वकील, प्राध्यापक, सैनिक सगळेच पाहिजे. त्याचप्रमाणे भूतमात्रात कावळा, चिमणी, सर्प माणसांसकट सर्व प्राणी पक्षी जलचर पाहिजेत. हे सर्व मिळूनच पर्यावरण होते. पर्यावरण म्हणजे काय? आपण सर्व जण एकमेकांवर अवलंबून आहोत. ही सर्वांनी एकमेकांवर अवलंबून राहण्याची जी व्यवस्था आहे तिलाच पर्यावरण असे म्हणतात. ही एक साखळी आहे. ह्या साखळीतील. एक जरी काडी निखळली तरी त्याचा सगळ्यावर दुरोगामी परिणाम होतो. उदाहरणार्थ गिधाडे आता लुप्त होत चाललेली आहेत. निसर्गात जेव्हा प्राणी जेव्हा मारतो तेव्हा ती घाण, कुजलेल्या अवशेषांना गिधाडे फस्त करतात. मात्र आता गिधाडांची संख्याच कमी झाल्यामुळे ती घाण पडून राहून त्यातून काहीसे रोग निर्माण होतात व हे रोग नंतर सर्वत्र पोहोचतात. हे असे आपण सर्व एकमेकांना जोडलेले आहोत व एकमेकांवर अवलंबून आहोत. केवळ माणसेच नव्हे तर निसर्गाचे सर्व घटक एकमेकांवर अवलंबून आहेत, पण आपल्याला हे कळत नाही. पर्यावरण राखा असे जे सांगितले जाते, त्याचे कारण हे आहे. पर्यावरण राखणे म्हणजे फक्त वृक्ष जोपासणे असे नव्हे. वृक्ष जोपासणे, वृक्ष संवर्धन हे तर हवेच, पण त्याबरोबर इतर अनेक घटक आहेत. सर्व उपयुक्त आहे म्हणूनच "खल्विदं ब्रह्म" असे म्हटलेले आहे. ब्रह्माचा अर्थ मी वेगळा लावला. जगात जे जे निर्माण झाले आहे ते व ते सर्वच खरोखर उपयुक्त आहे. हे मी का सांगतो आहे. धर्म धर्म म्हणून आपण ज्याला म्हणतो त्या धर्माची उपासना, जोपासना ही व्हायलाच हवी, पण त्याचबरोबर प्रत्यक्षात मानवधर्म, म्हणजेच माणसाने माणसासारखे वागावे, राहावे, तसे संबंध एकमेकांशी ठेवावे ह्याचे सचोटीने वर्तनात आणले पाहिजे. जगात जे काही अयोग्य अनिष्ट चालू आहे ते थांबवायचे असेल तर ह्या मानवधर्माचे सर्वांकडून पालन हाच त्यावरचा उपाय.




**जीवन संगीत**

**सद्गुरू वामनराव पै**

# संतांना कसे ओळखावे?

धान्यामध्ये काही खडे असे असतात की, धान्यापासून ते वेगळे निवडता येत नाहीत. तांदळांत पांढरे खडे असतात, ते निवडू गेले तरी निवडले जात नाहीत. त्याप्रमाणे साधू लोक हे आपल्यात असतात, त्यांना पाहू गेले तर ते आपल्यासारखेच संसारात वावरत असलेले दिसतात; पण खरे पाहता ते आपल्यापेक्षा वेगळे असतात. पुस्तकांतून साधूची लक्षणे पुष्कळ दिलेली असतात. पण त्याप्रमाणे आपण पाहू गेलो तर साधू ओळखता येईलच असे नाही. साधूचे एकच अचूक लक्षण सांगता येईल, ते हे की, जो सर्व ठिकाणी देवाला पाहू शकतो तो साधू. पण एवढ्यावरून आपल्याला तो ओळखता येईल का? नाही तर जेव्हा आपण साधू व्हावे, तेव्हाच आपल्याला साधूला ओळखता येईल.




**अध्यात्म**

**ब्रह्मचैतन्य**

**श्री गोंदवलेकर महाराज**

जगात आपण कुणाचीच निंदा करू नये. आपण जेव्हा दुसऱ्याचे दोष पाहतो, म्हणजेच ते जेव्हा त्याच्याजवळ आहेत असे दिसतात, त्या वेळेस तेच दोष आपल्याजवळ सूक्ष्म रूपाने असतात असे समजावे आणि आपण लगेच देवाला शरण जाऊन, 'हे माझे दुर्गुण काढून टाक', म्हणून त्याची करुणा भाकावी, आपण जेव्हा 'जगात न्याय उरला नाही' असे म्हणतो, त्या वेळेस आपल्याजवळ तो दोष आहे समजावे. म्हणून आपण कुणाचे दोष पाहू नयेत. आपण आपल्या स्वतःला आधी सुधारावे. चित्तशुद्धी केल्याशिवाय आपल्या मनात सर्व ठिकाणी भगवद्भाव उत्पन्न होणार नाही. म्हणून जेव्हा जेव्हा आपल्याला दुसऱ्याचे दोष दिसतात, तेव्हा आपलेच चित्त अशुद्ध आहे असे समजून आपण परमात्म्याची करुणा भाकून त्याला शरण जावे आणि 'माझे चित्त शुद्ध कर' अशी त्याला विनंती करावी. असे केले म्हणजे आपले चित्त शुद्ध होत जाते आणि मग भगवंताची प्राप्ती व्हायला वेळ लागत नाही.



जे मिश्रण आहे ते पचायला कठीण असते; उदाहरणार्थ, भाजणी. मिश्रण नसलेले एकच शुद्ध अन्न पचायला सोपे असते. हे जसे खरे, त्याचप्रमाणे आपले अंतःकरण अगदी शुद्ध असावे, म्हणजे ते सर्वांमध्ये लवकर मिसळते. पण आपल्या अंतःकरणामध्ये स्वार्थाचे मिश्रण असल्यामुळे ते सर्वांमध्ये समरस होऊ शकत नाही. शुद्ध अंतःकरणाच्या माणसाचे चालणे हळू, आणि बोलणे मृदू असते. तो सर्वांना प्रिय होतो. जगातले आपले समाधान किंवा असमाधान, ज्या वृत्तीने आपण जगाकडे पाहतो त्यावर अवलंबून असते. 'माझ्याकरिता मी नसून, मी लोकांकरिता आहे. माझ्याकरिता जग नसून मी जगाकरिता आहे,' ही वृत्ती आपण ठेवावी.

**तात्पर्य : सर्व चराचर भगवद्रूप जो पाहतो तो साधू.**

# कर्माचे चांदणे



आयुष्यात ऊन पावसाचे खेळ चालूच असतात पण त्याचा बाजार नसतो मांडायचा. मनाच्या कुपीत खोल खोल दडवून ठेवायचे ते क्षण आणि आयुष्याच्या सांजवेळी कोजागिरीच्या चंद्राच्या साक्षीने उलगडून पाहा ती आठवणींची मोरपंखी पैठणी. न्हाऊन निघायला होतं त्या आठवणींच्या मोरपिसाऱ्यात. आपल्या कर्मांचे देखील तसेच असते. म्हणजे अगदी माझ्याच शब्दात सांगायचे झाले तर,

***"चिमणीच्या वाटांनी...***
***फांदीवर विसावलेले...***
***कर्माचे चांदणे...***
***लामण दिव्यांच्या...***
***मिणमिणत्या प्रकाशात...***
***भोगांच्या रूपाने...***
***अंगणात उतरले..."***

माणसाच्या कर्मामुळे खेळलेल्या कित्येक जन्माच्या काचापाण्याच्या खेळाचे फलित म्हणून असलेले कर्माचे भोग म्हणजे 'जीवन'. पद, पदवी, जात आणि कुल यापेक्षा केशर गोंदणी पौर्णिमेच्या टिपूर चांदण्यासारखे आपले कर्म नितळ आणि निर्मळ असावे जेणेकरून आयुष्याच्या वेलीला सज्जनतेची तसेच उज्ज्वल चिरतरुण अशी बैठक देता येईल जेणेकरून जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून सहजतेने सुटका होऊन आपण मोक्षाच्या मार्गावर सहज पाऊल टाकू शकू.

म्हणजे कसं आहे ना की, आपल्या नशिबाचे फासे कसे पडावेत ते आपल्या हातात नसलं तरीही कुठल्याही प्रसंगात वाईट गोष्टी व्यभिचाराने किंवा वाम मार्गाने यश किंवा पैसा मिळवणे म्हणजे आपल्या वाईट कर्माच्या पोतडीत भर घालणे होय. मान्य की चढाओढीच्या या आयुष्यात कायम मोहाचे क्षण येतात पण, त्यावर मात करून आपल्या कर्माच्या वारुळात षड्रीपुंच्या नागांना आपण स्थान द्यायचे की नाही ते आपले आपणच ठरवायला हवे नाही का?

यात काही कर्म अशी असतात की जी खूपच सुखकर, ऐश्वर्यसंपन्न असे आयुष जगण्याचे मार्ग मोकळे करतातच आणि मग पुढे जाऊन त्याच पुण्याईवर मोक्षास नेतात. आजूबाजूला पाहिले तरी देखील इतरांच्या वागण्या-बोलण्यातून म्हणजेच कर्मांतून खूप काही चांगलं शिकवून जातात. संत साहित्यात अनेक ग्रंथ आहेत, त्यातीलच एक ज्ञानेश्वरी. ज्ञानेश्वरी हे एक असे अमृत आहे की जे कधीही, केव्हाही कसे ही प्राशन केले तरी ते प्रत्येक वेळी खूप काही वेगळे, खूप काही चांगले शिकवून जाते की ज्याचा फायदा हा आपल्याला रोजच्या जीवनात निर्णय घेण्याकरिता बरेचदा उपयोगी पडतो.



**ऋतुराज**

**ऋतुजा केळकर**

ज्ञानेश्वरी सांगते कर्मांनाही स्पर्श आहे, कधी मायेचा तर कधी... वासनेचा... कधी वैराग्याचा तर कधी षड्रिपूंचा... त्यांनाही नाद आहे, विचारांच्या उचंबळत्या लाटांचा... त्यांचाही रंग आहे, रंगपुष्करणीतील मोरपंखी अलवारतेचा... रूप आहे, कधी रूद्राक्ष माळेचं... तर कधी जीवाची काहिली करणाऱ्या अंगोपांगी गोंदवून घेतलेल्या आसूडांचं... कर्मांनाही गंध आहे, कधी बकुळीच्या माधवी गंधाचा... तर कधी निरस, शिळ्या, मरगळलेल्या निर्माल्याचा... जे जसे आहे त्याप्रमाणे त्याची फलिते आहेत हे विसरून चालणार नाही.

या साऱ्या कर्मांनीच अलवारपणे माणूस घडत जातो. तुम्हाला माहिती आहे का? हत्ती जेव्हा पिल्लू असतो ना तेव्हा त्याला अत्यंत जाड जाड लोखंडी साखळ्यांनी घट्ट बांधून ठेवण्यात येतं. तो ते साखळदंड तोडण्याचा प्रचंड प्रयत्न करतो अर्थातच त्यात त्याला अजिबात यश येत नाही पण तो त्यात खूप जखमी देखील होतो.



मग एक क्षण असा येतो की, तो ते साखळदंड तोडण्याचा प्रयत्न करणं सोडून देतो. मग कालांतराने त्याला साध्या दोरखंडाने बांधण्यात येते. इथं तो हत्ती दोरखंड सहज तोडून स्वतःला बंधमुक्त करू शकत असतो पण त्याच्या आठवणींमध्ये मला हे बंध तोडता येणार नाहीत, जर मी तो प्रयत्न केला तर मला फक्त आणि फक्त आताच होईल असा आठवणींचा भुतकाळ त्याला त्या बंधनातून मोकळं करत नाही. म्हणजेच एखाद्या माहुताच्या त्याला साखळदंडाने बांधण्याच्या कर्मामुळे तो हत्ती कायमचा बंधनात बांधला जातो याचप्रमाणे कित्येकदा दुसऱ्याच्या कर्मापायी आपल्याला काही भोग भोगावे लागतातच.

म्हणूनच एकंदरच साऱ्यांच्याच कर्मांकडून आपण काय घ्यायचं ते आपणच शिकायला हवं. सामाजिक प्रतिष्ठेला लागणारा धक्का, सत्ताधिकाऱ्यांचे भय, दुष्टांचा जाच यांचा विचार करून आजच्या वर्तमानाची आनंदप्रधान कल्पनेने डवरलेली पाने ही द्वेष, मद, मत्सर, भय, भीती, क्रोध, ईर्षा यांनी करपवून आपली वर्तमानातील कर्मे नासवून... आठवणींच्या खोल खोल डोहातून अभयदान देणारा निरामय तसेच प्रसन्नतेचे मळे फुलवणारा मोक्ष मिळवायचा ते आपणच ठरवायला हवं नाही का?


# प्रभावी रामरक्षा स्तोत्र

आताच चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा झाला. या पवित्र दिवशी चैत्र नवरात्रोत्सवाची सुरुवात झाली. चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून हिंदू नूतन वर्षाला सुरुवात होते. चैत्र शुद्ध नवमीला मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्रांचा जन्म झाल्याने हा दिवस आपण रामनवमी म्हणून साजरा करतो. रामनवमीच्या दिवशी बऱ्याच ठिकाणी अकरा वेळा रामरक्षा म्हणण्याचे पाठ देखील होतात. रामरक्षेला रामरक्षा कवच, रामरक्षा मंत्र किंवा रामरक्षा स्तोत्र असे ही म्हणतात. तर या रामरक्षेची निर्मिती कशी झाली आणि या रामरक्षेचे महत्त्व काय आहे?

एकदा देवी पार्वतीने महादेवांना विचारले जसे विष्णू सहस्त्रनाम आहे तसे रामाचेही एखादे स्तोत्र असेल ना? देवाधी देव महादेव यांनी देवी पार्वतीला रामरक्षा स्तोत्राची कथा सांगितली. वाल्मिकी ऋषींनी शंभर कोटी श्लोक असलेले रामायण लिहिले. हे रामायण देव, दानव, मानव सर्वांनाच आपल्याकडे असावे असे वाटू लागले आणि ते मिळवण्यासाठी सर्वजण महादेवांकडे गेले. ते स्वतःला मिळावे म्हणून सर्वजण एकमेकांशी वाद घालू लागले. तेव्हा महादेवांनी रामायणाची समान वाटणी करण्याचे ठरवले. शंभर ही सम संख्या असल्याने समान वाटणी केली तरीही एक श्लोक राहिलाच. त्या श्लोकात बत्तीस अक्षरे होती. त्याची समान वाटणी केल्यानंतर दोन अक्षरे उरली. ती दोन अक्षरे महादेवांनी स्वतःकडे ठेवली आणि ते ध्यानाला बसले; परंतु इकडे देव, दानव व मानव यांच्या डोक्यात दुसराच विचार चालू होता. महादेवांनी ती दोन अक्षरे स्वतःकडे ठेवली याचा अर्थ ती अक्षरे नक्कीच महत्त्वाची असणार. सर्वजण महादेव ध्यानातून बाहेर येण्याची वाट पाहू लागले. बरेच तास झाले तरी महादेव काही ध्यानातून बाहेर येईनात. शेवटी वाट बघून कंटाळल्याने एक एक जण जाऊ लागला; परंतु एक ऋषी मात्र तिथेच थांबले होते. महादेवांकडे अजून नक्कीच महत्त्वाचे काही आहे आणि ते आपल्यालाही मिळावं म्हणून ते वाट पाहत बसले होते पण मधेच त्यांना डुलकी लागली आणि त्याचवेळी महादेव ध्यानातून बाहेर आले. ते त्या ऋषींकडे प्रेम भावाने बघत राहिले आणि त्यांच्या स्वप्नात जाऊन त्यांनी त्या ऋषींना रामरक्षेचे श्लोक सांगितले. ज्यावेळी ऋषींना जाग आली. त्यांना स्वप्नातले श्लोक आठवले आणि त्यांनी सुरेख अशा रामरक्षेची निर्मिती केली.

त्या ऋषींचे नाव होते बुधकौषिक ऋषी...

समर्थ रामदास स्वामींनी लिहिलेल्या शंकराच्या आरतीमध्ये शेवटच्या कडव्यात तीसरी ओळ "शतकोटीचे बीज वाचे उच्चारी" अशी आहे... शतकोटीचे बीज म्हणजेच जी महादेवांनी आपल्याकडे ठेवून घेतलेली दोन अक्षरे रा आणि म "राम"... रामरक्षा स्तोत्र महादेवांनी स्वप्नात सांगितले म्हणून रामरक्षेतील सगळी अक्षरे तारक आहेत. त्यामुळे रामरक्षेला रामरक्षा मंत्र असे म्हणतात. रामरक्षेच्या पठणाने आपल्या शरीराभोवती एक कवच तयार होते म्हणून तिला रामरक्षा कवच असेही म्हणतात. रामरक्षेमधील चारपासून ते दहापर्यंतचे जे श्लोक आहेत त्या श्लोकात आपल्या शरीरातील प्रत्येक अवयवाचे नाव घेऊन त्या अवयवाचे राम रक्षण करो असा आशय आहे.



**मनाचा गाभारा**

**अर्चना सरोदे**



रामरक्षां पठेत्प्राज्ञः पापघ्नीं
सर्वकामदाम् । शिरो मे राघवः पातु
भालं दशरथात्मजः ॥४॥
कौसल्येयो दृशौ पातु
विश्वामित्रप्रियः श्रुती । घ्राणं पातु
मखत्राता मुखं सौमित्रिवत्सलः
॥५॥
जिव्हां विद्यानिधिः पातु कण्ठं
भरतवंदितः । स्कन्धौ दिव्यायुधः
पातु भुजौ भग्नेशकार्मुकः ॥६॥
करौ सीतापतिः पातु हृदयं
जामदग्न्यजित् । मध्यं पातु
खरध्वंसी नाभिं जाम्बवदाश्रयः
॥७॥
सुग्रीवेशः कटी पातु सक्थिनी
हनुमत्प्रभुः । ऊरू रघुत्तमः पातु
रक्षःकुलविनाशकृत् ॥८॥
जानुनी सेतुकृत्पातु जङ्घे
दशमुखान्तकः । पादौ
बिभीषणश्रीदः पातु रामोऽखिलं
वपुः ॥९॥
एतां रामबलोपेतां रक्षां यः सुकृती
पठेत् । स चिरायुः सुखी पुत्री
विजयी विनयी भवेत् ॥१०॥

वरील सात श्लोक म्हणजेच रामरक्षा कवच. या रामरक्षा कवचामुळे आपल्या शरीराचा प्रत्येक अवयव अभिमंत्रित होतो. प्रत्येक अवयवाचे स्वतंत्र पठण केल्याने त्या त्या अवयवाचे फळ मिळते. रामरक्षा तिन्हीसांजेला हातपाय धुवून शुचिर्भूत होऊन म्हणावी. रामरक्षा म्हणताना मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्रांची मूर्ती डोळ्यांसमोर आणावी आणि एकाग्र चित्ताने रामरक्षेचे पठण करावे. रामरक्षेच्या नित्य पठणाने एक शक्ती मिळते आणि ती आपले नेहमी रक्षण करते. भय, चिंता कष्टांचे निवारण होते. बऱ्याच ठिकाणी तिन्हीसांजेला रामरक्षा नियमित म्हटली जाते. घरात आजारी व्यक्ती असेल तर रामरक्षा ऐकवली जाते जेणेकरून त्याच्या प्रभावाने ती व्यक्ती लवकर बरी होते. म्हणूनच रामरक्षेला प्रभावी स्तोत्र म्हणतात. असे म्हणतात की, रामरक्षा स्तोत्र हे विष्णूसहस्त्रनामा इतकेच प्रभावी आहे. मग या रामनवमीपासून रोज तिन्हीसांजेला रामरक्षा म्हणायची किंवा ऐकायची हे मनाशी ठरवूनच टाकूया... हो ना!!!

# जयभिम महोत्सवात कार्यक्रमांची रेलचेल!

**संयोजन समिती** | **कार्यक्रमांचा आनंद घेण्याचे आवाहन**



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:विश्वरत्न, बोधीसत्व, महामानव तथा भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीडच्या वतीने विविध कार्यक्रमांने साजरी होत आहे. हा जयभिम महोत्सव शुक्रवार (दि.४) एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत साजरा होत असून या महोत्सवात धम्मदेसना, व्याख्याने, विद्रोही कवि संमेलन, रक्तदान शिबिरे, भिमगीत स्पर्धा, समता ज्योत मिरवणूक आदी विविध कार्यक्रमांची रेलचेल होणार आहे. तरी या जयभिम महोत्सवाचा सर्वांनी आनंद घ्यावा असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे की, बीडच्या जयभिम महोत्सवाने अवघ्या राज्याला आदर्श निर्माण करुन दिला आहे. त्या अनुषंगाने विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीडच्या वतीने विविध परिवर्तनवादी कार्यक्रम हाती घेत साजरी होत आहे. या जयभिम महोत्सवाची सुरूवात शुक्रवार (दि.४) एप्रिल पासून धम्मदेसना कार्यक्रम घेवून सुरूवात झाली आहे. हा जयभिम महोत्सव १४ एप्रिल पर्यंत चालणार असून या दहा दिवसांच्या कालावधीत विविध कार्यक्रम पार पडणार आहेत. विशेषतः म्हणजे बीडच्या सार्वजनिक जयभिम महोत्सवाचे कौतूक अवघ्या महाराष्ट्राने केलेले असून हा जयभिम महोत्सव आदर्श व प्रेरणा घालून देणारा ठरलेला आहे. एवढेच नाही तर गेल्या काही वर्षांपासून बीडची आंबेडकरी जनता स्वबळावर हा जयभिम महोत्सव साजरा करीत आहे. त्यामुळे अवघ्या राज्याने बीड जयभिम महोत्सवाची प्रेरणा घेतलेली असून आता अनेक जिल्हे-गावे अशा आदर्श घालून देणार्या जयंत्या काढू लागले आहेत. हा जयभिम महोत्सव परिवर्तनाच्या व आनंदाच्या वातावरणात पार पाडण्यासाठी सार्वजनिक जयंती उत्सव समितीसह आंबेडकरी समुदायातील उपासक-उपासीका तसेच प्रत्येक व्यक्ती आपआपली जबाबदारी पार पाडत आहेत. या जयभिम महोत्सवाच्या सर्व कार्यक्रमांचा शहरासह जिल्ह्यातील तमाम जनतेनी आनंद घ्यावा असे आवाहन विश्वरत्न यांच्यासह डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीसह आंबेडकरी जनतेनी केले आहे.

### असे होणार कार्यक्रम...

शुक्रवार दि.४ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे सायंकाळी ६ वाजता पूज्य भिक्खू धम्माशिल थेरो, यांची धम्मदेसना होणार आहे. शनिवार दि.५ रोजी सायं ६ वाजता संगीत रजनी रविवार दि.६ रोजी तुलसी इंग्लिस स्कुल येथे १० ते ६ या वेळेत महापुरूष सामान्यज्ञान स्पर्धा. सकाळी ११ ते ५ यावेळत आंबेडकर भवन येथे भिमगीत गायण स्पर्धा. सोमवार दि.७ रोजी आंबेडकर भवन येथे सकाळी ११ ते ५ महापुरुष वक्तृत्व स्पर्धा, सायं ६ वाजता मडऑक आणि लढा क्रांतीचा नाटक, मंगळवार दि.८ रोजी आंबेडकर भवन येथे सकाळी ११ ते ५ महिलांचे विविध कार्यक्रम तर सायं ६ वाजता डॉ.राजेंद्र गोणारकर यांचे व्याख्यान होणार आहे. बुधवार दि.९ रोजी सकाळी ११ ते ५ विद्रोही कवि संमेलन तर सायं ६ पान २ वर

# पुलाचे काम त्वरित पूर्ण करावे

**अॅड.मनोज संकाये : अभियंत्याकडे केली मागणी**



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी: गंगाखेड राष्ट्रीय महामार्गावरील पुलाचे काम अर्धवट राहिल्याने वाहनधारकांना व नागरिकांना याचा नाहक त्रास भोगाव लागत आहे. शारीरिक आणि मानसिक आरोग्याची हेळसांड होत असल्याने महामार्गावरील शहरातील रतन सिटीच्या जवळील पुलाचे काम अर्धवट राहिले आहे तसेच खोदलेल्या रस्त्याचे काम ऊर्जा पेट्रोल पंपापर्यंत अर्धवट आहे त्याचे काम त्वरित पूर्ण करावे अशी मागणी राष्ट्रीय महामार्गाचे अभियंता यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते अॅड.मनोज संकाये यांनी केली आहे.

परळी गंगाखेड या महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतुकीची रहदारी आहे. शासकीय बसेस तसेच प्रावेट वाहनधारक या मार्गाचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात परंतु सध्या या महामार्गाचे काम चालू असल्याने हा मार्ग खोदण्यात आला आहे त्यामुळे ऊर्जा पेट्रोल पंपा जवळील पुलाचे काम अर्धवट राहिले आहे त्यामुळे त्या ठिकाणी वाहनधारकांचा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दैनंदिन रहदारी करणारे नोकरदार वर्गातील वाहनधारकांचे सध्या हाल असून त्यांना कमरेचे आणि हाडाचे विविध आजार जडले आहेत त्यामुळे त्यांची आर्थिक पिळवणूक होत आहे. राष्ट्रीय महामार्गाचे संबंधित अधिकारी यांनी या महामार्गावरील पान २ वर

# आमरण उपोषणाचा घेतला निर्णय

**निवेदन:अवैध प्लॉट खरेदी विक्रीची चौकशी करा**

पुण्यभूमी प्रतिनिधी



माजलगाव:तालुक्यातील भाटवगाव ग्रामपंचायत अंतर्गत गट नंबर १६० व १३८ मधील अवैध प्लॉटची खरेदी विक्री व्यवहारांची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करून रस्ता रहदारीस पर्वत चालू करून द्यावा या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते सुरेश साळवे व रमेश साळवे हे येथील पंचायत समिती कार्यालय समोर काल दि ३ गुरुवारी पासून आमरण उपोषणाला बसले आहेत या विषय अधिक माहिती अशी की, तालुक्यातील भाटवगाव ग्रामपंचायत अंतर्गत शहराला खेटून असलेल्या गट नंबर १३८ मध्ये सार्वजनिक रस्ताच याच ग्रामपंचायत मध्ये कार्यरत असलेले ग्रामसेवक चव्हाण यांनी फुस लावून रस्त्यावर पत्र्याचे शेड उभारून सार्वजनिक रस्ता अडवून रहिवासी पान २ वर

# बीडमध्ये रिपाइंकडून ईद मिलाप

**बंधुभाव:उपस्थित राहण्याचे पप्पू कागदेंचे आवाहन**

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रतीक असलेल्या प्रवित्र रमजान ईदचे औचित्य साधून सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी आणि हिंदू-मुस्लीम भाईचारा वाढविण्यासाठी बीड शहर रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी दि.६ एप्रिल रविवार रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत बशीर गंज चौक बीड येथे ईद मिलन (मिलाफ) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

रमजान ईदचे औचित्य साधून सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी पान २ वर

# साहित्य संमेलन भरविणे काळाची गरज

**आश्रुबा कोठावळे:भूम येथेसाहित्य संमेलन**

पुण्यभूमी प्रतिनिधी



कळंब:शहरीकरणा बरोबरच ग्रामीण भागात सुद्धा मोठ्या प्रमाणात बाल साहित्यिक आहेत यांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी साहित्य संमेलन आयोजित करणे काळाची गरज असल्याचे मत बाल साहित्यिक आश्रुबा कोठावळे यांनी भूम येथिल बालकुमार मराठी साहित्य संमेलनात मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

गुरुवार दि.३ एप्रिल २०२५ रोजी भूम येथिल जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये अखिल भारतीय बालकुमार मराठी साहित्य संस्था पुणे तालुका शाखा भूम व जनसेवा ग्रामीण विकास संस्था उळूप तालुका भूमच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय बालकुमार मराठी साहित्य संमेलन आदर्श मुख्याध्यापक तात्यासाहेब कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले या साहित्य संमेलनाला भूम, वाशी, कळंब तालुक्यातील बालकुमार साहित्यिकासह ज्येष्ठ साहित्यिकांची मोठया प्रमाणात उपस्थिती होती.या साहित्य संमेलनात ऊन,वारा,पाऊस, आई,वडील,निसर्ग, शेती अशा वेगवेगळ्या विषयाला हात घालून बाल साहित्यिकानी आपल्या स्वरचित काव्य सादरीकरण करून उपस्थित सर्वांचं लक्ष वेधून घेतलं,या संमेलनातून काव्य वाचन केलेल्या प्रत्येक बालकवीला आयोजकांच्या वतीने सन्मान चिन्ह,सन्मानपत्र व छत्रपती शिवाजी महाराज,राष्ट्रमाता जिजाऊ साहेब यांच्या चरित्र असलेल्या पुस्तकांची भेट देण्यात आली याशिवाय प्रथम समता ठाणांबीर,व्दीतीय प्रांजल खैत्रे,तृतीय पान २ वर

# बाजारात जागा नसल्याने बोंबाबोंब!

**मागणी:केज प्रशासनाने प्रश्न सोडवावा**



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील साळेगाव मध्ये जनावरांचा आठवडी बाजार प्रत्येक गुरवारी भरतो परंतु साळेगावचा जनावरांचा बाजार प्रसिद्ध होत चालला आहे तसेच साळेगाव मध्ये प्रत्येक गुरवारी बाहेर जिल्ह्यातील जनावरे गाय, म्हैस, बैल, खुप मोठ्या प्रमाणावर खरेदी विक्री करण्यासाठी येत आहेत त्यामुळे पशुधन बाजारात वाढत चालले आहे त्यामुळे साळेगाव मध्ये जनावरांच्या बाजार भरण्यासाठी जागा उपलब्ध आहे परंतु त्या संध्या उपलब्ध आहे त्या बाजार मैदानात जागा खुप अपुरी पडत पान २ वर

# व्हॉइस ऑफ मीडियाच्या निवडी

**अभिनंदनिय: तालुकाध्यक्षपदी वैजनाथ घायतिडक, कार्याध्यक्षपदी गणेश काटकर**

पुण्यभूमी प्रतिनिधी





माजलगाव:देशपातळीवर काम करणाऱ्या पत्रकारांच्या व पत्रकारितेच्या हितासाठी लढा देणाऱ्या व्हॉइस ऑफ मीडिया या संघटनेच्या माजलगाव तालुकाध्यक्षपदी वैजनाथ घायतिडक यांची फेर निवड तर कार्याध्यक्षपदी गणेश काटकर यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

देशात २३ राज्यांमध्ये पत्रकारांना सोबत घेऊन देश पातळीवरील काम करणाऱ्या पत्रकारांच्या व पत्रकारितेच्या हितासाठी लढा देणाऱ्या व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, राज्य कार्याध्यक्ष अनिल मस्के, जिल्हा कार्याध्यक्ष दिनेश लिंबेकर, जिल्हाध्यक्ष जालिंदर धांडे यांनी मंगळवारी,दि.१ रोजी जिल्ह्यातील व्हाईस ऑफ मीडियाच्या तालुकाध्यक्ष व कार्याध्यक्ष च्या निवडी घोषित केल्या यात माजलगाव तालुका अध्यक्षपदी वैजनाथ घायतिडक यांची फेर निवड करण्यात आली आहे. तर कार्याध्यक्षपदी दिंद्रुड येथील पत्रकार गणेश काटकर यांची निवड करण्यात आली आहे. यांच्या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. माजलगाव तालुका पान २ वर




**परळी:** अभियंता शाहूराज येवते यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना, गणेश बांगर, श्रीकांत मद्रेवार, एस. एस. धर्माधिकारी, गजेंद्र धनोरिया, सोळंके, गणेश गित्ते आणि भगवान साकसमुद्रे आदी.

**डॉ.नामदेव शिनगारे** | **महामानव अभिवादन ग्रुपतर्फे शालेय साहित्य वाटप**

# यशासाठी जिद्द,चिकाटी महत्वाची!

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:शिक्षण म्हणजे सत्य जाणणे, वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगून, दैववाद, किंवा अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी परंपरेतून, बाहेर पडल्याशिवाय उच्च स्वप्नपूर्ती करिता. जिद्द, चिकाटी व प्रयत्नाच्या सातत्याची आवश्यकता आहे. अशी प्रत्येक विद्यार्थ्याने मनाशी खुणगाट बांधावी असे प्रतिपादन प्रा. डॉ.नामदेव शिनगारे यांनी केले.

महामानव अभिवादन ग्रुपला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिन म्हणजेच २०२४ रोजी मिळालेले साहित्य वाटपाचा नव्या फेरीतील धानोरा रोड बीड नागसेन बुद्ध विहारात आयोजित कार्यक्रमात अध्यक्षपदी लाभलेल्या नागसेन बुद्ध विहार मंडळाच्या सचिव केशर कांबळे व प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ.नामदेव शिनगारे , अॅड तेजस वडमारे व एस.एस. सोनवणे यांच्या हस्ते ४३ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही पेन) वाटप करण्यात आले. याप्रसंगी ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले , वाचाल तर वाचाल चे अध्यक्ष डी.जी. वानखेडे, कॅप्टन राजाभाऊ आठवले याची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक गायकवाड यांनी तर सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक यु.एस. वाघमारे यांनी प्रस्तावित केले. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते आदर्शाच्या प्रतिमेचे पुष्प व पुष्प माला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पालकांशी व विद्यार्थ्यांशी हितगुज साधताना प्रा. शिनगारे पुढे म्हणाले की दीन, दलित, गरजू व वंचितांची सेवा हीच सेवा मानव कल्याणाची आहे. हा संत गाडगेबाबांचा बहुमोल उपदेश असू, वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगून त्या वैज्ञानिक प्रगतीला तथागताने सांगितलेल्या पंचशीलाची जोड दिल्यासच जगात शांतता व बंधुत्वाची वृद्धी होईल व जग विनाशापासून वाचेल असे अनेक उदाहरणाद्वारे स्पष्ट केले. याप्रसंगी न्यू स्टार रायझिंग इंग्लिश स्कूलचे कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी अत्यंत सोप्या भाषेत बालकांना समजावून सांगितले की विद्यार्थीदशेत गुरुजनांची , पालकाची आज्ञा पाळणे व ज्ञान मिळवणे, तरुणपणी शील पालन करून दोन कमावले व म्हातारपणी सुख समाधानाने जगून होईल तेवढे समाज रोड पान २ वर

# रिपब्लिकन सेनेत अनेकांचा पक्ष प्रवेश

**पक्षांतर:नगरमध्ये पक्षाची वाढते ताकत**



पुण्यभूमी प्रतिनिधी

नगर: रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून नगर येथील अनेक पक्षातील युवा व जेष्ठ नेत्यांनी सुनील भाऊ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष प्रवेश केला

दादर येथील रिपब्लिकन सेनेच्या कार्यालयात सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत नगर येथील रिपब्लिकन पक्षाचे महेश भोसले ऑल इंडिया पँथरचे अतुल भिंगारदिवे गणेश पहार बाळासाहेब कसबे रविंद्र उरुणकर महिला आघाडी बेबीताई टकले नेहा जावळे सुनीता शिंदे यांच्या सह प्रमुख कार्यकर्त्यांनी जाहीर पक्ष प्रवेश केला या वेळी महाराष्ट्र सचिव विनोद काळे मुंबई अध्यक्ष प्रकाश भाऊ खंडागळे उपस्थित होते

आगामी काळात कार्यकर्त्यांनी सर्व समाजातील प्रत्येक जाती धर्माचे युवकांना जोडुन पक्ष संघटनेचा विस्तार करावा व सामाजिक कार्यात अग्रेसर राहण्याचे आवाहन आनंदराज आंबेडकर यांनी केले बुद्धगया येथील महाबोधी महाविहार पान २ वर